सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

नियोजन विभाग (रोजगार हमी योजना)

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना

# वार्षिक अहवाल सन २०२२-२०२३





**महाराष्ट्राच्या विकासासाठी कटीबध्द....**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## नियोजन (रोजगार हमी योजना) विभाग

### महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना

# वार्षिक अहवाल सन २०२२-२३

नवीन प्रशासन भवन, १६ वा मजला, मंत्रालय मुंबई - ४०००३२
संकेतस्थळ - www.mahaegs.maharashtra.gov.in
ई-मेल : egsdesk9-mh@gov.in

# अनुक्रमणिका


१. संदेश मा. मंत्री (रोहयो)

२. प्रस्तावना

३. योजनेची पार्श्वभूमी ------------------------------------------- १

४. योजनेची उद्दिष्टे ------------------------------------------- २

५. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची वैशिष्ट्ये----------- २

६. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अनुज्ञेय कामे ------ ८

७. कामांचे वार्षिक नियोजन --------------------------------------- ११

८. योजनेंतर्गत कामे -------------------------------------------- १३

९. निधीचे व्यवस्थापन ------------------------------------------ १४

१०. मजुरी व साधन सामुग्रीवरील खर्चाचे प्रमाण ------------------------ १६

११. माहिती व्यवस्थापन कार्यप्रणाली (MIS) ------------------------- १७

१२. रोजगार हमी योजनेचे संकेतस्थळ ------------------------------- १९

१३. कार्यक्रमाची अंमलबजावणी यंत्रणा ------------------------------ १९

१४. विभागाची प्रशासकीय संरचना ---------------------------------- २४

१५. सामाजिक अंकेक्षण ------------------------------------------ २६

१६. तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsman) ------------------ ३०

१७. महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद ----------------------------- ३१

१८. पारदर्शकता व सक्षमीकरण ------------------------------------ ३२

१९. महत्वाची वैशिष्ट्यपूर्ण कामे ----------------------------------- ३६

२०. प्रचार व प्रसिध्दी ------------------------------------------- ३८

२१. क्षमता बांधणी ---------------------------------------------- ४०

२२. योजनेस चालना देण्याकरिता करण्यात आलेल्या उपाययोजना ---------- ४१

२३. योजनेची फलनिष्पत्ती ---------------------------------------- ४४

२४. राज्य रोजगार हमी योजनेची सद्यस्थिती --------------------------- ४५

२५. सांख्यिकीय माहिती ------------------------------------------ ५३



**संदीपान भुमरे**

**मंत्री,**
**रोजगार हमी योजना व फलोत्पादन,**
**महाराष्ट्र राज्य**

## संदेश

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केवळ रोजगार पुरवणारी योजना नसून विकासाची एक नवी योजना म्हणून समोर येत आहे. ग्रामीण भागातील जो मजूर अकुशल कामाच्या शोधात आहे, अशा मजूरास शेतकरी, मजूर, कष्टकरी या सर्व अकुशल घटकांना रोजगार उपलब्ध करुन देणे, अशा रोजगारातून कायमस्वरुपी उत्पादक मत्ता निर्माण करणे व अशा निर्माण होणाऱ्या मत्तांमधून गरिबीचे निर्मुलन करणे ह्या नव्या रुपाने समोर येणा-या योजनेमधून अपेक्षित आहे.

मी मंत्री झाल्यानंतर या योजनेत ग्रामीण भागात योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घोषित केले त्यामुळे योजना ग्रामीण भागात सर्वदूर पोहोचत आहे आणि त्याचा दृश्य परिणामही दिसून येत आहे.

ही योजना गाव केंद्रित ऐवजी कुटुंब केंद्रित करण्यात यश येत आहे. यासाठी मा.मंत्रीमंडळ बैठकीत सुविधा संपन्न कुटुंब आणि सर्वांगीण ग्राम समृध्दी अभियान राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याद्वारे यथार्थदर्शी नियोजनासोबतच दशवार्षिक नियोजनाच्या माध्यमातून प्रत्येक गावाचे व गावातील प्रत्येकाचे समृध्दीचे मॉडेल तयार करण्यात येत आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत फळबाग लागवड यासाठी एक नवीन अँड्रॉइड ॲप्लिकेशन तयार करण्यात आले असून याद्वारे आता ऑनलाईन पध्दतीने फळबाग लागवड मागणी करण्यात येत आहे. तसेच केळी, द्राक्ष, ड्रॅगन फ्रुट या फळ पिंकाचा त्याचप्रमाणे द्राक्ष शेतीसाठी आच्छादन देखील देण्यात येत आहे. तसेच सोनचाफा सारख्या फुल पिकांचा, लवंग, दालचिनी, मिरी आणि जायफळ या मसाला पिकांचा नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. जेणेकरुन ग्रामीण भागातील शेतकरी समृध्द होईल.

शेतक-यांना शेती विषयक अवजारे, बियाणे, खते व निर्माण झालेला शेतीमाल ने-आण करण्यासाठी मातोश्री ग्राम समृध्दी शेत पाणंद रस्ते योजना राज्यात राबविण्यात येत असून परिणामकारक सुसंवादाने शेती मधील रस्त्यांचे अतिक्रमण दूर करुन प्रत्येक शेताला रस्ता हे ध्येय समोर ठेवून वाटचाल करण्यात विभागाला यश येत आहे.

शासन पातळीवर मूलगामी बदल करुन ही योजना राज्याला समृध्द करण्याचा प्रयत्न आहे.

मागील आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून सर्वाधिक निधी उपलब्ध करुन घेण्यात आला आहे.

सन २०२२-२३ मध्ये मा.मुख्यमंत्री महोदय आणि उपमुख्यमंत्री महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली विभागामार्फत केलेले काम, योजनेंतर्गत निर्माण झालेले मनुष्य दिवस, झालेला खर्च, पूर्ण झालेली कामे ही सर्व माहिती विधिमंडळात सादर करताना मला मनस्वी समाधान होत आहे.

**संदीपान भुमरे**



दिनेश वाघमारे (भाप्रसे)

**प्रधान सचिव,**
**रोजगार हमी योजना,**
**महाराष्ट्र शासन.**

# प्रस्तावना

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र शासनाची महत्वाकांक्षी योजना महाराष्ट्र राज्यातही अधिक लोकप्रिय झालेली आहे. गोरगरीबांच्या उपजिविकेच्या संसाधनाचा पाया मजबूत करणे, सामाजिक सहभागाची सुनिश्चिती व पंचायत राज संस्था बळकट करणे ही या योजनेची मुलभूत वैशिष्ट्ये आहेत. यात वैयक्तिक व सार्वजनिक स्वरुपाच्या कामांच्या मागणीमध्ये निश्चितच वाढ होत आहे. महाराष्ट्र राज्यात सन २०२२-२३ मध्ये ३.५४ लाख इतकी कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

सदर योजनेचे लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचावेत यासाठी विभागाने दूरचित्रवाणी, वर्तमानपत्रातील जाहिराती या माध्यमातून तसेच एक दिवस मजुरांसोबत, मजूर दिवस इत्यादी नवीन संकल्पना कार्यान्वित केल्या आहेत. यामुळे सन २०२२-२३ या वर्षात २१.२१ लाख कुटुंबातील ३७.०७ लाख मजूरांनी या योजनेवर काम केले असून मत्ता निर्मितीत सहभाग नोंदविला आहे.

गावाचा सर्वांगीण विकास होण्याकरिता अमृत महोत्सवी फळबाग योजना, मातोश्री पाणंद रस्ते व शरद पवार ग्राम समृध्दी योजना राबविण्यात येतात. योजनेंतर्गत गुरांसाठी पक्का गोठा बांधणे, शेळीपालन शेड बांधणे, कुक्कुटपालन शेड बांधणे, भूसंजीवनी नाडेप कंपोस्टींग, शेततळे, शोषखड्डे इत्यादी कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काही योजनांच्या संयोजनातून करण्यात येतात.

मातोश्री ग्राम समृध्दी शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत राज्यात शेत पाणंद रस्त्यांची कामे मोठया प्रमाणात घेण्याकरिता शासन स्तरावरुन जिल्हानिहाय आराखडे मंजूर करण्यात आले आहेत.

कुटुंबाच्या कोणत्यातरी एक किंवा अनेक प्रकारच्या वंचिततेवर मात करण्याच्या उद्देशाने मनरेगा व अन्य विभागांच्या योजना यांच्या अभिसरणातून **"सुविधा संपन्न कुटुंब मिशन"** आणि **"सर्वांगीण ग्रामसमृध्दी योजना"** राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सन २०२२-२३ मध्ये मनरेगा अंतर्गत वैयक्तिक लाभाच्या व्हर्मी कंपोस्टींग, फळबाग लागवड, नाडेप कंपोस्टींग, शौचालये व शोषखड्डे घेण्याची व सार्वजनिक लाभाच्या वृक्ष लागवड-संगोपन व संरक्षण, रोपांची निर्मिती, अंगणवाडी बांधकाम ही कामे इतर विभागाच्या अभिसरणाद्वारे (Convergence) घेण्यात आली असून अन्य विभागासोबतचे अभिसरणाचे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सन २०२२-२३ मध्ये योजनेंतर्गत ७८८.०६ लक्ष मनुष्यदिवस निर्माण होऊन रु.२९९१.६९ कोटी खर्च झालेला आहे. या संदर्भात फलनिष्पत्ती अहवाल मा.विधानमंडळास सादर करण्यात येत आहे. योजनेतंर्गत १,३८,८६७ कुटुंबांना १०० दिवसावरील मजूरी राज्य शासनाकडून देण्यात आली आहे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याचा एक भाग म्हणून केंद्र शासनाने मिशन अमृत सरोवर सुरु केले आहे. राज्यात सन २०२२-२३ या वर्षात एकूण ३१४३ कामांची स्थळे निवडण्यात आली आहेत. त्यापैकी दि. ३१ मार्च, २०२३ अखेर एकूण १५०० अमृत सरोवरांची कामे पूर्ण झाली असून ७७९ कामे प्रगतीपथावर आहे.

**दिनेश वाघमारे**

# योजनेची पार्श्वभूमी

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाची अंमलबजावणी १९७७ पासून महाराष्ट्रात सुरु झाली. राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ नुसार दोन योजना सुरु होत्या.

१) ग्रामीण भागात अकुशल व्यक्तींकरिता रोजगार हमी योजना.

२) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ कलम १२ (ई) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना.

सदर योजनांना राज्य शासनाच्या निधीतून अर्थसहाय्य केले जात होते.

२. सन २००५ मध्ये केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (विद्यमान नाव - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा) लागू केला, तसेच केंद्र शासनाने ज्या राज्यांना पूर्वी पासून रोजगार हमी अधिनियम मंजूर केला होता, अशा राज्यांना केंद्र शासनाच्या अधिनियमातील कलम २८ अन्वये त्यांचा कायदा राबविण्याची मुभा दिली होती. तद्नुसार महाराष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये पूर्वीचा कायदा ठेवण्याचा पर्याय स्विकारला आहे. मात्र, विधानमंडळाने केंद्रीय कायद्यास अनुसरुन राज्यास निधी मिळविण्याच्या अनुषंगाने १९७७ च्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपध्दतीत बदल झाला आहे.

३. सद्यःस्थितीत राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) अंमलात आहे व या कायद्यांतर्गत खालील दोन योजना सुरु आहेत :

अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र (MGNREGS) या योजनेंतर्गत केंद्र शासन १०० दिवस प्रतिकुटुंब रोजगाराची हमी देते व १०० दिवस प्रतिकुटुंब मजुरीच्या खर्चासाठी निधी पुरवते. प्रतिकुटुंब १०० दिवसावरील प्रत्येक मजुराच्या, मजुरीवरील खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते.

ब) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ सुधारित कलम (१२) (ई) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना अनुदान तत्वावर प्रतिपूर्ती योजना म्हणून राबविण्यात येतात.

उदा.: १) शेत पाणंद रस्ते योजना
२) जवाहर/धडक सिंचन विहीर योजना
३) मागेल त्याला शेततळे योजना
४) नागपूर विभागातील ११००० विहीरींचा धडक कार्यक्रम (वर्धा जिल्हा वगळून) तसेच सदर कार्यक्रमांतर्गत अतिरिक्त १३,००० विहीरींचा लक्षांक देऊन वर्धा जिल्ह्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

४. याशिवाय राज्य शासनाचा निधी पुढील बाबींकरिता वापरला जातो.

१) राज्य रोजगार हमी योजनेतील प्रगतीपथावरील अपूर्ण (कुशल) कामे पूर्ण करण्याकरिता.
२) राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याकरिता.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची उद्दिष्टे

अकुशल काम करण्यास इच्छुक असणा-या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्तींना योजनेंतर्गत १०० दिवस प्रतिकुटुंब रोजगाराची हमी देण्यात आली असून, त्या माध्यमातून स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे हे या योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील शेतकरी/शेतमजुरांना या अधिनियमाच्या माध्यमातून रोजगाराचा हक्क प्रदान करणे, सामाजिक सुरक्षा देणे, महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे, तसेच पंचायतराज संस्थाचे बळकटीकरण करण्यावर योजनेत भर देण्यात आला आहे. जिल्ह्यात हाती घेण्यात येणा-या सर्व कामांच्या एकूण किंमतीच्या प्रमाणात कमीतकमी ६० टक्के कामे ही, उत्पादक स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणारी असावीत व अशी कामे ही भूमी, जल व वृक्ष यांचा विकास करणारी कृषी व कृषिसंलग्न क्षेत्राशी निगडीत असावीत.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची वैशिष्ट्ये

१८ वर्षावरील प्रौढ व्यक्तिंना केंद्र शासनाची १०० दिवस प्रतिकुटुंब अकुशल रोजगाराची हमी, तर १०० दिवसांवरील प्रत्येक मजुराला रोजगाराची राज्य शासनाची हमी.

### मजुरांची नोंदणी व जॉबकार्ड :

रोजगार मिळविण्याकरिता जॉबकार्ड आवश्यक.

जॉबकार्डसाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज करणे आवश्यक.

ग्रामपंचायत मार्फत नोंदणी.

१५ दिवसांत जॉबकार्ड मिळणार.

प्रत्येक कुटुंबाला फोटोसह एक जॉबकार्ड विनामुल्य.



### कामाची मागणी व अर्ज :

रोजगार आवश्यक असणा-या नोंदणीकृत व्यक्तीने वेळोवेळी नमुना क्रमांक ४ मध्ये अर्ज करणे आवश्यक.

नमुना क्रमांक ४ ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध.

नमुना क्रमांक ४ मध्ये अर्ज केल्यानंतर ग्रामपंचायतीने पोचपावती देणे आवश्यक.

रोजगाराची मागणी नोंदणीकृत व्यक्ती किंवा समूह नमुना क्रमांक ४ मध्ये करु शकतो.



मजुराने किमान १४ दिवस कामाची मागणी करणे आवश्यक.

मागणी केल्यानंतर ग्रामपंचायतीने मजुराला १५ दिवसात रोजगार पुरविणे आवश्यक, अन्यथा बेरोजगार भत्ता अनुज्ञेय.

कामाच्या मागणीबाबत ग्रामपंचायतीने गटविकास अधिकारी यांना तात्काळ माहिती द्यावी.

गावापासून ५ कि.मी. परिसरात रोजगार उपलब्ध केला जाईल, अन्यथा जास्त अंतराकरिता प्रवास खर्चाची तरतूद.

ग्रामपंचायतीद्वारे पूर्ण गावातील कामांचे नियोजन.

## वैयक्तिक लाभाची कामे :

वैयक्तिक लाभाची कामे देताना पुढील प्रवर्गातील कुटुंबांच्या मत्तांबाबत कामांना प्राधान्य देण्यात येईल.

१) अनुसूचित जाती,
२) अनुसूचित जमाती,
३) भटक्या जमाती,
४) निराधिसूचित जमाती (विमुक्त जाती),
५) दारिद्र्य रेषेखालील इतर कुटुंबे,
६) स्त्री-कर्ता असलेली कुटुंबे,
७) शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्ती-कर्ता असलेली कुटुंबे,
८) जमीन सुधारणांचे लाभार्थी,
९) इंदिरा आवास योजनेखालील लाभार्थी,
१०) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वनवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ (२००७ चा २) खालील लाभार्थी आणि

उपरोक्त प्रवर्गामधील पात्र लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात आल्यानंतर, कृषी कर्जमाफी व कर्जसहाय्य योजना, २००८ या मध्ये व्याख्या केलेल्या लहान व सिमांत भूधारक शेतक-यांच्या जमिनीवरील कामांना, शर्तीच्या अधिनतेने प्राधान्य देण्यात येईल आणि अशा कुटुंबांच्या जमिनी अथवा घर/वाडीसंबंधी हाती घेण्यात येणा-या प्रकल्पावरील काम करण्यास तयार असलेल्या किमान एका सदस्याकडे जॉबकार्ड असणे आवश्यक असेल.

## मजुरीचे दर :

रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना देण्यात येणा-या मजुरीचा दर केंद्र शासन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ मधील कलम ६ नुसार प्रत्येक वर्षी निश्चित करते.

केंद्र शासन प्रत्येक वर्षी मजुरीचे दर ठरविते व ते केलेल्या कामाच्या प्रमाणात (मोजमापानुसार) मजुरांना अदा केले जाते.

केंद्र शासनाने राज्यासाठी खालीलप्रमाणे मजुरीचे दर निश्चित केलेले आहेत.

| अ.क्र. | वर्ष | मजुरीचा दर (रु.) |
|---|---|---|
| ०१ | २०२१-२२ | २४८/- |
| ०२ | २०२२-२३ | २५६/- |

## बँक पोस्टात मजुरांची खाती :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांची मजुरी, त्यांच्या बँक/पोस्टात असलेल्या खात्यामध्ये जमा केली जाते. राज्यात सन २०२१-२२ अखेरपर्यंत १०५.०७ लाख तर सन २०२२-२३ या वर्ष अखेरपर्यंत १०६.५२ लाख इतक्या मजुरांची खाती बँक/पोस्टात उघडण्यात आली आहेत.

सन २०२२-२३ अखेरपर्यंत राज्यात उघडण्यात आलेल्या १०६.५२ लाख इतक्या मजूरांच्या खात्यापैकी सर्वात जास्त गोंदिया जिल्ह्यात ५.५६ लाख मजूरांची खाती उघडण्यात आली. तर त्या खालोखाल नाशिक जिल्ह्यात (५.५३ लाख), अमरावती (४.९५ लाख), अहमदनगर (४.८२ लाख), नांदेड (४.७४ लाख) या जिल्ह्यात इतकी खाती उघडण्यात आलेली आहेत.

सन २०२२-२३ मध्ये बँक/पोस्टात खाती असलेल्या मजूरांची संख्या १०६.५२ लाख इतकी आहे.

## सोयी व सुविधा :

कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, प्रथमोपचार, विश्रांतीसाठी शेड, ५ पेक्षा जास्त लहान मुले असल्यास दायीची सोय.

मजुरीचे विलंब प्रदाने टाळण्यासाठी “आपले सरकार सेवा” केंद्रामार्फत ग्रामपंचायत स्तरावरुन ई-मस्टर काढण्याबाबत शासन निर्णय दि.२३ एप्रिल, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

बँकेद्वारे अथवा पोस्टामार्फत १५ दिवसात मजुरीचे प्रदान, अन्यथा ०.०५ टक्के विलंब आकार देय.

मजुरांना वेतन चिठ्ठीचे वाटप.

मनरेगा योजनेची माहिती, कामाची मागणी, तक्रार नोंदविण्यासाठी मनरेगा मदत वाहिनी क्रमांक (Helpline No) १८००-२३३-२००५ नागरीकांसाठी उपलब्ध



## मनुष्यदिवस निर्मिती :

योजनेंतर्गत सन २०२२-२३ या वर्षात ७८८.०६ लाख इतकी मनुष्यदिवस निर्मिती झाली आहे. राज्यात निर्माण झालेल्या एकूण ७८८.०६ लाख मनुष्यदिवस निर्मितीपैकी सर्वात जास्त मनुष्यदिवस निर्मिती अमरावती जिल्हयात (८३.३९ लाख) झालेली आहे. त्या खालोखाल गोंदिया (६२.४५ लाख), पालघर (४९.३८ लाख), बीड (४६.६८ लाख), चंद्रपूर (४१.६१ लाख) ह्या जिल्ह्यांत इतकी मनुष्यदिवस निर्मिती झालेली आहे.




## अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिलांचा सहभाग :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेंतर्गत सन २०२१-२२ या वर्षात योजनेंतर्गत निर्माण झालेल्या एकूण मनुष्यदिवस निर्मितीमध्ये अनुसूचित जमातीचे प्रमाण २४.७५%, तर अनुसूचित जातीचे प्रमाण ८.१७% इतके होते. तर २०२२-२३ या वर्षात हेच प्रमाण अनुक्रमे २०.१५% व ८.००% इतके आहे.

| अ.क्र. | तपशील | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|
| | | २०२१-२२ | २०२२-२३ |
| १ | महिला | ४३.६७% | ४४.७२ % |
| २ | अनुसूचित जमाती | २४.७५ % | २०.१५ % |
| ३ | अनुसूचित जाती | ८.१७ % | ८.०० % |

## महिलांचा सहभाग :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेंतर्गत महिला व पुरुषांमध्ये भेदभाव न ठेवता मजुरीचे दर समान ठेवण्यात आले आहेत. योजनेमध्ये महिलांचा मोठया प्रमाणात सहभाग असणे (किमान ३३ टक्के) गरजेचे आहे. योजनेंतर्गत राज्यामध्ये निर्माण झालेल्या एकूण मनुष्यदिवस निर्मिती मध्ये सन २०२१-२२ या वर्षात ४३.६७ टक्के इतका सहभाग महिलांचा होता. तर २०२२-२३ या वर्षात महिलांचा सहभाग ४४.७२ टक्के इतका आहे.




## कुटुंबाला १०० दिवस रोजगार :

सन २०२१-२२ या वर्षात योजनेत सहभागी झालेल्या २०.३६ लाख कुटुंबापैकी १.७४ लाख कुटुंबाना १०० दिवसांचा रोजगार पुरविण्यात आला. तर २०२२-२३ या वर्षामध्ये योजनेत सहभागी असलेल्या २१.२१ लाख कुटुंबापैकी १.३९ लाख कुटुंबाना १०० दिवसांचा रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला.





## योजनेंतर्गत राज्यात १०० दिवस रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटुबांची संख्या

(आकडे लाखात)

| तपशील | | वर्ष | |
|---|---|---|---|
| | | २०२१-२२ | २०२२-२३ |
| योजनेंतर्गत रोजगार उपलब्ध करुन दिलेल्या एकूण कुटुंबांची संख्या | कुटुंबांची संख्या | २०.३६ | २१.२१ |
| | मनुष्यदिवस निर्मिती | ८२५.३२ | ७८८.०६ |
| १०० दिवस रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटुंबांची संख्या | कुटुंबांची संख्या | १.७४ | १.३९ |
| | मनुष्यदिवस निर्मिती | २९१.२७ | २१८.९६ |

### प्रतिकुटुंब सरासरी मनुष्यदिवस निर्मिती :

योजनेंतर्गत २०२१-२२ या वर्षात प्रतिकुटुंब सरासरी ४१ दिवस एवढी मनुष्यदिवस निर्मिती झाली होती. तर २०२२-२३ या वर्षात प्रतिकुटुंब सरासरी ३७ दिवस एवढी मनुष्यदिवस निर्मिती झालेली आहे.





## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
## महाराष्ट्र योजनेंतर्गत अनुज्ञेय कामे

### प्रवर्ग अ : नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सार्वजनिक बांधकामे-

(एक)पेयजल स्त्रोतांसह भूजलाचे पुनर्भरण करण्यावर विशेष भर देऊन भूमिगत पाट, मातीची धरणे, रोधी धरणे, संरोधी धरणे यासारखी भूजल स्तर वाढविणारी व त्यात सुधारणा करणारी जलसंधारणाची व जलसंचयाची बांधकामे;

(दोन) व्यापक पाणलोट क्षेत्र प्रक्रिया करता येईल असे समतल चर, मजगी घालणे, समतल बांध, दगडी संरोधक, दगडमातीचे कक्षबांध (गॅबियन संरचना) आणि पाणलोट विकासाची कामे यांसारखी जल-व्यवस्थापन विषयक कामे;

(तीन) सूक्ष्म व लघु पाटबंधाऱ्याची कामे आणि सिंचन कालवे व नाली बांधणे, त्यांचे नूतनीकरण करणे व परिरक्षण करणे;

(चार) सिंचन तलाव व इतर जलाशये यांमधील गाळ उपसण्यासह पारंपारिक जलाशयांचे नूतनीकरण करणे;

(पाच) परिच्छेद ४ मध्ये अंतर्भूत असलेल्या कुटुंबाना फलोपयोग घेण्याचा रीतसर हक्क मिळवून देईल असे, सर्व सामान्य व वन जमिनींवरील सडक पट्ट्या, कालवा बांध, तलाव अग्रतट (टँक फोरशोअर) आणि किनारी पट्टे यावरील वनरोपण, वृक्षलागवड आणि फलोत्पादन;

(सहा) सामूहिक जमिनीवरील भूविकासाची कामे.

### प्रवर्ग ब : दुर्बल घटकांकरिता व्यक्तिगत मत्ता (फक्त परिच्छेद ४ मध्ये उल्लेखिलेल्या कुटुंबाकरिता) -

(एक) भूविकासामार्फत तसेच खोदविहिरी, शेततळी व इतर जलसंचयाच्या संरचनांसह सिंचनाकरिता योग्य त्या पायाभूत सुविधा उभारुन परिच्छेद ४ मध्ये विनिर्दिष्ट कुटुंबांच्या जमिनींची उत्पादकता वाढवणे;

(दोन) फलोत्पादन, रेशीम उत्पादन, रोपमाळा व प्रक्षेत्र वनीकरण यामार्फत उपजीविकेची साधने वाढवणे;

(तीन) परिच्छेद ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कुटुंबांच्या पडीक अथवा उजाड जमिनी लागवडीखाली आणण्याकरिता त्या जमिनींचा विकास करणे;

(चार) इंदिरा आवास योजनेंतर्गत किंवा राज्य व केंद्र शासनाच्या अशा अन्य योजनेंतर्गत मंजूर केलेल्या घरांच्या बांधकामामधील अकुशल वेतन घटक;

(पाच) पशुधनाला चालना देण्याकरिता कुक्कुटपालन संरचना, शेळीपालन संरचना, वराहपालन संरचना, गुरांचा गोठा, गुरांना चारा देण्यासाठी गव्हाणी व पाणी देण्यासाठी हाळ यांसारख्या पायाभूत सुविधा निर्माण करणे; आणि

(सहा) मत्स्यव्यवसायाला चालना देण्याकरिता मासे सुकविण्यासाठी ओटे, साठवण सुविधा यांसारख्या तसेच सार्वजनिक जमिनीवरील हंगामी जलाशयांमधील मत्स्यशेतीला चालना देण्याकरिता पायाभूत सुविधा निर्माण करणे.









## प्रवर्ग क : राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान अंतर्गत स्वयं सहाय्यता गटांकरिता सामाईक पायाभूत सुविधा -

(एक ) जैविक खतांकरिता आवश्यक असणाऱ्या शाश्वत पायाभूत सुविधा उभारुन आणि कृषि उत्पादनांसाठी पक्क्या स्वरुपाच्या साठवण सुविधांसह हंगामोत्तर सुविधा उभारुन कृषी उत्पादकतेस चालना देण्याबाबतची कामे; आणि

(दोन) स्वयं - सहायता गटांच्या उपजिविकेच्या उपक्रमांकरिता सामाईक कार्यकक्ष.

## प्रवर्ग ड : ग्रामीण पायाभूत सुविधा -

(एक) 'हगणदारीमुक्त' गावाचा दर्जा संपादन करण्याच्या उद्देशाने एकतर स्वतंत्रपणे किंवा शासकीय विभागाच्या इतर योजनांच्या अभिसरणातून व्यक्तिगत घरगुती शौचालय, शाळेतील प्रसाधनगृहे, अंगणवाडी-प्रसाधनगृहे आणि विहित मानकांनुसार घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन यासारखी ग्रामीण स्वच्छतेसंबंधातील कामे;

(दोन) रस्त्यांनी न जोडलेल्या गावांना बारमाही ग्रामीण रस्त्यांनी जोडणे आणि निश्चित करण्यात आलेली ग्रामीण उत्पादन केंद्रे विद्यमान पक्क्या रस्त्यांच्या जाळ्याशी जोडणे; आणि गावामधील पार्श्व नाली व मोऱ्या यासह अंतर्गत पक्के रस्ते अथवा मार्ग बांधणे;

(तीन) खेळाची मैदाने उभारणे;

(चार) ग्राम व गट स्तरावर पूरनियंत्रण व संरक्षण कामांसह आपत्कालीन सिध्दता ठेवणे अथवा रस्ते पूर्ववत करणे अथवा इतर आवश्यक सार्वजनिक पायाभूत सुविधांचे पुनर्स्थापन करणे, सखल भागात जलनिःस्सारण व्यवस्थेची तरतूद करणे, पुराचे पाणी वाहून नेणारे प्रवाह मार्ग खोल करणे, व त्यांची डागडुजी करणे, प्रवनिकेचे नूतनीकरण करणे, तटीय क्षेत्राच्या संरक्षणासाठी नाल्याचे (स्टॉर्म वॉटर ड्रेन) बांधकाम करणे;

(पाच) ग्राम व गट स्तरावर ग्रामपंचायती, महिला स्वयं-सहाय्यता गट, संघ, चक्रीवादळ छावणी, अंगणवाडी केंद्रे, गावबाजार व स्मशानभूमी इत्यादींकरीता इमारती बांधणे;

(सहा) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ (२०१३चा२०) याच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता अन्नधान्य साठवण इमारती बांधणे;

(सात) अधिनियमांतर्गत करावयाच्या बांधकामाचा अंदाजाचा भाग म्हणून त्याकरिता लागणा-या बांधकाम साहित्याची निर्मिती करणे;

(आठ) अधिनियमांतर्गत निर्माण केलेल्या ग्रामीण सार्वजनिक मत्तांचे परिरक्षण करणे;

(नऊ) राज्य शासन यासंदर्भात अधिसूचित करेल अशी इतर कोणतीही कामे; आणि

(दहा) केंद्र सरकार राज्य शासनाशी विचारविनिमय करुन अधिसूचित करेल असे अन्य कोणतेही काम.

प्रत्येक ग्रामपंचायत, स्थानिक क्षेत्राची क्षमता, स्थानिक गरजा व साधनसंपत्ती विचारात घेऊन व परिच्छेद ८ च्या तरतुदींनुसार ग्रामसभेच्या सभांमध्ये प्रत्येक कामाचा प्राथम्यक्रम निर्धारित करील.

गवत कापणे, खडीकरण करणे, शेतीची कामे यांसारखी अमूर्त स्वरुपाची, मोजता न येण्याजोगी व वारंवार उद्भवणारी कामे हाती घेण्यात येणार नाहीत.

# कामाचे वार्षिक नियोजन

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत नियोजनाला महत्वाचे स्थान आहे. योजनेंतर्गत प्रत्येक वर्षी कामाचा वार्षिक आराखडा तयार करणे अनिवार्य असून त्याला लेबर बजेट असे संबोधण्यात येते.

## कामाचा वार्षिक आराखडा तयार करणे

राज्य कायद्यांतर्गत अधिनियमाच्या कलम ६.१(अ) अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची असून, कलम ६.१(क), ६.१(ब) व कलम ६ (सुधारित २०१४) नुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नियोजन व कार्यवाही करण्याच्या संदर्भात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हापरिषद या प्रमुख यंत्रणा आहेत.

योजनेंतर्गत मजुरांना स्थानिक पातळीवर रोजगार देण्यासोबतच गावातील पायाभूत सोयींच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या जलसंधारण, वृक्षारोपण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दारिद्र्य रेषेखालील शेतकरी, तसेच इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनीचा विकास करणे आणि गावातील अंतर्गत रस्ते, पाणंद रस्ते इत्यादी कामांचा समावेश वार्षिक आराखड्यात असणे आवश्यक आहे.

कामाचा वार्षिक आराखडा तयार करताना मागील वर्षात निर्माण झालेले मनुष्यदिवस, रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटुंबांची संख्या, प्रतिकुटुंब सरासरी मनुष्यदिवस निर्मिती, मजुरी व साहित्यावरील खर्च इत्यादी बाबी विचारात घेणे आवश्यक असते.

योजनेंतर्गत पुढील आर्थिक वर्षात ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात, ग्रामपंचायतीमार्फत व इतर यंत्रणेमार्फत करावयाच्या कामाचे नियोजन करुन शेल्फवर ठेवण्याच्या कामांची यादी तयार करण्यात येते व नियोजित दिवशी दिनांक १५ ऑगस्ट रोजी ग्रामसभा घेऊन त्यामध्ये पुढील आर्थिक वर्षाच्या कामांना मंजुरी प्राप्त करुन घेणे आवश्यक असते.

योजनेंतर्गत ग्रामपंचायत व यंत्रणेमार्फत घ्यावयाच्या कामांचा प्राथम्यक्रम ठरवून ग्रामसेवकामार्फत प्रस्ताव सह कार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी) यांच्याकडे सादर केला जातो. प्रस्तावाची छाननी केल्यानंतर, तो कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) यांच्याकडे पाठवला जातो. तद्नंतर कार्यक्रम अधिकारी यांच्या गटातील सर्व ग्रामपंचायतीच्या नियोजन आराखड्यांचा एकत्रित प्रस्ताव जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांच्याकडे सादर करतात. जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांच्यामार्फत प्रस्तावाची पडताळणी केल्यानंतर, तो मंजुरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात येतो. जिल्हा परिषदेकडून मान्यता मिळाल्यानंतर, जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांचेमार्फत कामाचे लेबर बजेट शासनास सादर केले जाते व शासन त्याला केंद्र शासनाची मंजुरी घेते. मंजुर केलेल्या लेबर बजेटप्रमाणे गावात योजनेंतर्गत कामे घेण्यात येतात.

लेबर बजेट तयार करतांना गावपातळीवरुन नियोजन करणे आवश्यक आहे. सदरचे नियोजन करणे सुलभ व्हावे याकरिता www.nregalb.org ह्या संकेतस्थळावर ग्रामपंचायतनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्यात येते.






## कामांचा वार्षिक आराखडा तयार करण्याकरीता वेळापत्रक :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| १५ ऑगस्ट | ग्रामसभेत वार्षिक आराखडा मंजूर करुन घेऊन, कार्यक्रम अधिकाऱ्यांना सादर करणे. |
| १५ सप्टेंबर | कार्यक्रम अधिकारी ग्रामपंचायतीचा एकत्रित आराखडा पंचायत समितीला सादर करणे. |
| २ ऑक्टोबर | पंचायत समिती गटनिहाय वार्षिक आराखडा तयार करुन, जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांना सादर करणे. |
| १५ नोव्हेंबर | जिल्हा कार्यक्रम समन्वयक जिल्ह्याचा वार्षिक आराखडा व लेबर बजेट जिल्हा परिषदेला सादर करणे. |
| १ डिसेंबर | जिल्हा परिषद जिल्ह्याच्या वार्षिक आराखडयास मंजुरी देणे. |
| १५ डिसेंबर | जिल्हा कार्यक्रम समन्वयक प्रत्येक ग्रामपंचायतीत घ्यावयाच्या कामांचे शेल्फ तयार करणे. |
| ३१ डिसेंबर | सर्व जिल्हे त्यांचे लेबर बजेट, आयुक्त (नरेगा) यांना सादर करुन आयुक्त (नरेगा) ते शासनामार्फत केंद्र शासनास मान्यतेसाठी सादर करणे. |
| जानेवारी | केंद्र शासनाद्वारे लेबर बजेटचे परीक्षण व त्रुटी असेल तर शासनाद्वारे त्रुटीची पूर्तता करणे. |
| फेब्रुवारी | केंद्रीय प्राधिकृत समितीची बैठक व राज्याच्या लेबर बजेटला मान्यता. |
| फेब्रुवारी/ मार्च | मंजूर लेबर बजेट राज्यास वितरित करणे व राज्याद्वारे महिनानिहाय व जिल्हानिहाय एम.आय.एस. मध्ये नोंद घेऊन त्यांची माहिती जिल्हा, गट व ग्रामपंचायतीस देणे. |
| ७ एप्रिल पूर्वी | राज्य शासन वर्षाच्या सुरुवातीचा शिल्लक निधी केंद्र शासनास कळविल व केंद्र शासन निधीचा पहिला हप्ता राज्यास वितरित करेल. |

## योजनेंतर्गत कामे

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते, पुरनियंत्रण, जलसंधारण व संवर्धन, दुष्काळ प्रतिबंधक, लघुसिंचन, जमिनीच्या विकासाकरिता सिंचनाची कामे, पारंपारिक जलस्त्रोतांचे नुतनीकरण, भूविकास, राजीव गांधी सेवा केंद्र, ग्रामीण पेयजल, ग्रामीण स्वच्छता अभियान इत्यादी विषयक कामे घेण्यात येतात. सन २०२१-२२ या वर्षात २,३२,५७७ इतकी कामे पूर्ण करण्यात आली आहेत, तर २०२२-२३ या वर्षात ३,५४,२६१ कामे पूर्ण करण्यात आली असून दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी ८.६१ लाख इतकी कामे प्रगतीपथावर आहेत.

सन २०२२-२३ या वर्षात पूर्ण झालेल्या ३,५४,२६१ कामापैंकी सर्वात जास्त जमिनीच्या विकासाकरिता सिंचनाची ३,१४,७६५ इतकी कामे पूर्ण झाली आहेत. त्या खालोखाल दुष्काळ प्रतिबंधक १३,३१७ कामे, ग्रामीण स्वच्छता अभियानांतर्गत ७,९८० कामे, जलसंधारण व जलसंवर्धनाची ६,५९३ कामे, तसेच ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते ४,७८२ इत्यादी कामे पूर्ण झाली आहेत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०२२-२३ मध्ये २३,२३६ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आलेली आहे.




# Geo Tagging Phase - I & II

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या कामांची तीन टप्प्यामध्ये Geo Tagging करणे आवश्यक आहे. त्यानुसार कामाच्या सुरुवातीला, काम सुरु असताना व काम पूर्ण झाल्यानंतर कामाचे  Geo Tagging करण्यात येते.

त्या अनुषंगाने, राज्यात सन २०२२-२३ मध्ये पहिल्या Phase मध्ये एकूण १२,१८,६४१ कामापैंकी १२,१६,७०९ इतक्या कामांची Geo Tagging करण्यात आले असून एकूण टक्केवारी ९९.८४% इतकी आहे. तसेच दुस-या Phase मध्ये पहिल्या टप्यात कामाच्या सुरुवातीला एकूण १३,९६,५९८ कामांपैकी ११,३१,०८८ इतक्या

कामांची Geo Tagging करण्यात आली असून एकूण टक्केवारी ८०.९९% इतकी आहे. दुसऱ्या टप्प्यात एकूण ६,९९,९४४ कामांपैकी ५,८५,०१७ कामांचे काम सुरु असतांना Geo Tagging करण्यात आले असून, एकूण टक्केवारी ८३.५८% टक्के इतकी आहे. तसेच तिसऱ्या टप्प्यामध्ये एकूण ३,७३,३८९ कामांपैकी ३,०८,८८५ कामांचे काम पूर्ण झाल्यानंतर Geo Tagging करण्यात आले असून एकूण टक्केवारी ८२.७२% इतकी आहे.

## निधीचे व्यवस्थापन

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र या योजनेंतर्गत वित्तीय वर्षात कुटुंबाला १०० दिवसांची अकुशल रोजगाराची हमी केंद्र शासनाने दिली आहे. तर १०० दिवसांवरील प्रत्येक मजुराला रोजगाराची हमी राज्य शासनाने दिली आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ च्या तरतुदीनुसार योजनेंतर्गत होणाऱ्या खर्चाचा भार केंद्र शासन व राज्य शासन खालीलप्रमाणे उचलते:

### अ) केंद्र शासन खालील बाबींवरील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत खर्चाचा भार उचलते :

१) वित्तीय वर्षात प्रतिकुटुंबाच्या १०० दिवसांच्या अकुशल मजुरीवरील खर्च.

२) साधनसामुग्री, कुशल व अर्धकुशल मजुरांच्या रोजंदारीवरील एकूण खर्चाच्या ७५ टक्के खर्च.

३) केंद्र शासनाने ६% प्रशासकीय खर्च अनुज्ञेय केलेला आहे.

उपरोक्त बाबींसाठी केंद्र शासनाने सन २०२१-२२ मध्ये रु.२०९३.७२ कोटी व सन २०२२-२३ करिता रु.२४१७.६७ कोटी इतका निधी राज्यास वितरीत केला आहे.

### ब) राज्य शासन खालील बाबींवरील खर्चाचा भार उचलते :

१) राज्य रोहयोकरिता वैयक्तिक लाभांच्या योजनांवरील खर्च (उदा. जवाहर/धडक सिंचन विहिरी, फलोत्पादन).

२) जुन्या रोहयोची अपूर्ण कामे.

३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत २५ टक्के कुशल खर्च.

४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत १०० दिवसांवरील प्रतिकुटुंबावर होणारा मजुरीचा तसेच सामुग्रीचा खर्च.

५) मजुराने कामाची मागणी केल्यानंतर १५ दिवसांत काम उपलब्ध करुन न दिल्यास देय बेरोजगारी भत्याचा खर्च.

# योजनेकरिता वितरित निधी

सदर योजना ही मागणी प्रवण (DEMAND DRIVEN SCHEME) आहे. राज्यात २०२२-२३ या वर्षात एकूण रु.२९९१.६९ कोटी इतका खर्च झालेला आहे.

## योजनेकरिता वितरित निधी-२०२२-२३

(रु.कोटीत)

| तपशील | वितरीत निधी |
|---|---|
| केंद्र शासनाकडून वितरीत निधी | २४१७.६७ |
| राज्य शासनाकडून वितरीत निधी | ५७४.०२ |
| एकूण उपलब्ध | २९९१.६९ |



# मजूरी व साधन सामुग्रीवरील ६०:४० खर्चाचे प्रमाण
# (Wage & Material Ratio)

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र या योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामावरील खर्चाचे मजुरी व साहित्याचे प्रमाण ६०:४० निश्चित करण्यात आले आहे. म्हणजेच, अकुशल मजुरीवरील खर्च कामाच्या एकूण खर्चाच्या ६० टक्के पेक्षा कमी असू नये, तर साहित्यावरील खर्चाचे प्रमाण ४० टक्क्याच्या मर्यादेत राखणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायत व इतर अंमलबजावणी यंत्रणांकडून हाती घेण्यात येणाऱ्या सर्व कामांकरिता कुशल व अर्धकुशल मजूरांच्या मजूरीसह साहित्यावरील खर्चाचे प्रमाण जिल्हास्तरावर ४० टक्के पेक्षा अधिक ठेवण्यात येत नाही.

## मजूरी व साहित्यावरील खर्चाचे प्रमाण

| तपशील | वर्ष | |
|---|---|---|
| | २०२१-२२ | २०२२-२३ |
| **मजूरीवरील खर्चाचे प्रमाण** | ८३ | ६९ |
| **साहित्यावरील खर्चाचे प्रमाण** | १७ | ३१ |

## मजूरी व साहित्यावरील खर्चाचे प्रमाण : २०२२-२३



# केंद्र शासनाची माहिती व्यवस्थापन कार्यप्रणाली (MIS)

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करताना पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने तसेच, सनियंत्रणासाठी केंद्र शासनामार्फत माहिती व्यवस्थापन कार्यप्रणाली (MIS) विकसित करण्यात आली आहे. या कार्यप्रणालीवर योजनेबाबतची सांख्यिकीय माहिती व योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाची माहिती देण्यात येते. यामध्ये रोजगाराची स्थिती, रोजगार पुरविण्याबाबत माहिती, विविध प्रवर्गातील कामे, लेबर बजेट, मनुष्यदिवस निर्मिती, झालेला खर्च इत्यादी इत्यंभूत माहिती या कार्यप्रणालीवर उपलब्ध होते. सदर कार्यप्रणाली ही महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा कणा असून, या योजनेचे यश या कार्यप्रणालीवर प्रतिबिंबित होते. योजनेंतर्गत (MIS) कार्यप्रणालीमध्ये काम करण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात (MIS) समन्वयकाची व माहिती नोंदणीकरिता लिपिक-डेटा एन्ट्री ऑपरेटर यांची नेमणूक करण्यात आली आहे. ही माहिती ध्ध्ध्.दद्धड्ढढ्ढ.दत्ड़.त्द या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.




महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची माहिती सर्वसामान्य जनतेला उन्पलब्ध व्हावी व योजनेचा व्यापक प्रसार करण्याच्या अनुषंगाने मनरेगा/रोहयो विभागाचे संकेतस्थळ (Website) कार्यान्वित करण्यात आले. या संकेतस्थळावर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेविषयी सविस्तर माहिती नागरीकांकरीता उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या संकेतस्थळाचे www.mahaegs.maharashtra.gov.in लोकार्पण मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात आले.




## ई-मस्टर व इलेक्ट्रॉनिक फंड मॅनेजमेंट सिस्टीम (e-FMS)

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पारदर्शकता वाढीस लागण्याच्या दृष्टीने, तसेच मजूरांच्या कामाची अचूक नोंद हजेरीपटावर होऊन मजुरी वाटप जलदगतीने होण्याच्या दृष्टीकोनातून राज्यात इलेक्ट्रॉनिक हजेरी पत्रक (ई-मस्टर) अंमलात आणण्यात आले आहे. तसेच योजनेंतर्गत मजुरीच्या प्रदानाकरिता, मजुराच्या बँक/पोस्ट मधील बचत खात्यात थेट रक्कम जमा करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक फंड मॅनेजमेंट सिस्टीम या प्रणालीचा अवलंब करण्यात येतो. सदरील प्रणाली अंतर्गत, नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफरद्वारे निधीचे प्रदान होत असल्याने, निधी अभावी मजुरीचे प्रदान प्रलंबित रहात नाहीत व मजुरांच्या खात्यात थेट मजूरी जमा होते.

## विलंब आकार

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र या योजनेंतर्गत मजुरांना हजेरीपत्रक बंद झाल्यानंतर १५ दिवसाच्या कालावधीमध्ये मजुरी प्रदान करणे कायद्याने बंधनकारक आहे. तथापि तांत्रिक मनुष्यबळांचा अभाव व अंमलबजावणीतील अडथळे यामुळे काही वेळा विहित वेळेत मजुरी प्रदान करणे शक्य होत नाही. १५ दिवसांच्या कालावधीत मजुरीचे प्रदान न झाल्यास प्रतिदिन ०.०५ टक्के दराने विलंब आकार अदा करण्यात येतो. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये राज्यात वेळेवर मजुरी प्रदान करण्याची टक्केवारी ही ९० टक्के असून, ५१.५९ लक्ष इतका विलंब आकार (DELAYED COMPENSATION PAID) मजुरांना प्रदान करण्यात आलेला आहे.

## रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेचे संकेतस्थळ

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची संगणकीय माहिती केंद्र शासनाच्या एम.आय.एस. या कार्यप्रणालीवर उपलब्ध होत आहे, परंतु योजनेंतर्गत विविध माहिती, शासन निर्णय, परिपत्रक इत्यादी सर्व माहिती एकाच संकेतस्थळावर उपलब्ध होण्याकरिता विभागामार्फत http://mahaegs.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे.




## कार्यक्रमाची अंमलबजावणी यंत्रणा

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता राज्यस्तरावर नियोजन विभागांतर्गत स्वतंत्र रोहयो प्रभाग असून, मा. प्रधान सचिव हे रोहयो प्रभागाचे प्रमुख आहेत. तसेच, या प्रभागाकरिता दोन उप सचिव व दोन अवर सचिव, सहाय्यक संचालक (रोहयो), संशोधन अधिकारी, कक्ष अधिकारी व कर्मचारी वर्ग कार्यरत आहेत.

२) योजनेची अंमलबजावणी गतिशील होण्याच्या दृष्टीने व योग्य सनियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने नागपूर येथे आयुक्तालय स्थापन करण्यात आले असून, आयुक्त (नरेगा) हे आयुक्तालयाचे प्रमुख आहेत. संपुर्ण राज्याकरिता योजनेचे वार्षिक नियोजन करणे, सर्व जिल्ह्यांचे लेबर बजेट शासनास सादर करणे, जिल्ह्यांना निधीचे वितरण करणे, MIS चा नियमित अहवाल केंद्र शासनास ऑनलाईन पुरविणे इत्यादी

महत्वाची कामे आयुक्तालयामार्फत पार पाडली जातात.

३) कलम १३ (अ) अन्वये शासन व जिल्हा यंत्रणा यांच्यातील समन्वय ठेवण्याच्या दृष्टीने तसेच, योजनेच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने विभागीय आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या कार्यालयामध्ये उप आयुक्त (रोहयो) हे पद निर्माण करण्यात आले असून, या कार्यालयामध्ये आवश्यक ते अधिकारी, कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

४) या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी जिल्हा पातळीपासून सुरु होत असल्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्हा कार्यक्रम समन्वयकाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

यंत्रणेचे व योजनेचे सनियंत्रण, नियोजन, निधी वाटप, प्रशासकीय मान्यता, कामाची तपासणी इत्यादी महत्वाच्या जबाबदा-या जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांच्याकडे सोपविण्यात आल्या आहेत. त्यांच्या मदतीकरीता उप जिल्हाधिकारी (रोहयो) व आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र या योजनेंतर्गत कार्यान्वित होणारी किमान ५० टक्के कामे ग्रामपंचायतीमार्फत घेणे बंधनकारक असल्याने, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्याकडे सह जिल्हा कार्यक्रम समन्वयकाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्यांना सहाय्यक म्हणून १२ जिल्ह्यांमध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा) हे पद निर्माण करण्यात आले आहे, तसेच गटविकास अधिकारी (नरेगा) व आवश्यक अधिकारी / कर्मचारी वर्ग पुरविण्यात आलेला आहे. जिल्हा कार्यक्रम समन्वयकास मदत करणे, मजुर आराखडा (Labour Budget) मंजूर करुन घेणे, प्रशासकीय मान्यता, कामाची तपासणी इत्यादी महत्वाच्या जबाबदा-या सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मुख्य कार्यकारी अधिकारी) यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या आहेत.

(५) तालुका पातळीवर या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) व सह कार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी) यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे.

यंत्रणेमार्फत कार्यान्वित केल्या जाणा-या कामास प्रशासकीय मान्यता देणे, सनियंत्रण ठेवणे, मजुरीचे प्रदान, सामाजिक अंकेक्षण, तक्रार निवारण इत्यादी महत्वाच्या जबाबदा-या कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या आहेत.

ग्रामपंचायतीमार्फत कार्यान्वित केल्या जाणाऱ्या कामास प्रशासकीय मान्यता देणे, मजुरीचे प्रदान, कामाची तपासणी, ग्रामपंचायतीकडून कामाचा आराखडा तयार करुन घेणे, योजनेबाबत जनजागृती करणे, सनियंत्रण ठेवणे, मजुरीचे प्रदान, सामाजिक अंकेक्षण, तक्रार निवारण, इत्यादी महत्वाच्या जबाबदाऱ्या सह कार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी) यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या आहेत.

वन विभाग, सामाजिक वनिकरण, पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकाम, कृषि व इतर, तसेच ग्रामपंचायत या यंत्रणेद्वारे या योजनेंतर्गत कामे पार पाडली जातात.

(६) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये ज्या तालुक्यांमध्ये २ लक्ष पेक्षा जास्त मनुष्यदिवस निर्माण झाले आहेत, त्या तालुक्यांसाठी विशेष तांत्रिक अधिकारी मगांराग्रारोहयो (Special Technical Officer-MGNREGA) यांची जिल्हा परिषद आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता व कृषी अधिकारी (पंचायत समिती) संवर्गातील ९६ पदे निर्माण करण्यात आली आहेत. सदर पदांना दि.३१.०७.२०२२ पर्यत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(७) ग्रामपंचायत ही योजनेची मुख्य यंत्रणा आहे. ग्रामपंचायत क्षेत्रातील मजुरांची नोंद करणे, त्यांना जॉबकार्ड वितरीत करणे, हजेरी पत्रक ठेवणे, मागणीनुसार मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देणे, कामाचा आराखडा तयार करणे, मजुर आराखडा तयार करणे, स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे, योजनेविषयी जनजागृती करणे, इत्यादी महत्वाच्या जबाबदा-या ग्रामपंचायतीवर सोपविण्यात आलेल्या आहेत.

या कामी ग्रामसेवक व त्यास मदतनीस म्हणून ग्रामरोजगार सेवक यांच्यावर कामाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

(८) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत सुलभता यावी व ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हा परिषद यांना प्रभावीपणे काम करता यावे यासाठी बाहयस्थ मनुष्यबळ (Outsourced Manpower) घेण्यात आले आहे. यामध्ये लिपिक व डेटा एन्ट्री ऑपरेटर (Clerk -Cum Data Entry Operator), सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (APO), तांत्रिक अधिकारी (TO), कार्यक्रम व्यवस्थापक (PM), जिल्हा MIS समन्वयक (MIS-CO-Ordinator), इत्यादी बाहयस्थ मनुष्यबळाची नेमणुक करण्यात आली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र या योजनेंतर्गत २८०० हुन अधिक कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा घेण्यात आलेली आहे. तसेच ग्रामसेवक यांना मदतीसाठी २७,००० पेक्षा जास्त ग्रामरोजगार सेवक कार्यरत आहेत.





## योजने अंतर्गत मंजूर पदांची स्थिती (दिनांक ३१ मार्च, २०२३ अखेर)

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | मंजूर पदे | | |
|---|---|---|---|---|
| | | नियमित | कंत्राटी | एकूण |
| १ | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र आयुक्तालय, नागपूर | १८ | ०२ | २० |
| २ | विभागीय आयुक्त कार्यालये | ७५ | २९ | १०४ |
| ३ | जिल्हाधिकारी कार्यालये | २७० | ६८ | ३३८ |
| ४ | जिल्हा परिषद कार्यालये | १७० | ३४ | २०४ |
| ५ | अव्वल कारकून (तहसिल कार्यालय) | ३५३ | ० | ३५३ |
| | **एकूण** | ८८६ | १३३ | १०१९ |
| अ | उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक-नरेगा (उप मुख्य कार्यकारी अधिकारी) | १२ | | १२ |
| ब | विशेष तांत्रिक अधिकारी (STO) | ९६ | | ९६ |

## योजने अंतर्गत नियुक्त कंत्राटी कर्मचारी

| अ.क्र. | कंत्राटी कर्मचारी | कार्यरत कर्मचारी |
|---|---|---|
| १ | कार्यक्रम व्यवस्थापक (Programme Manager) | २१ |
| २ | तांत्रिक अधिकारी (Technical Officer) | ११९२ |
| ३ | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (Assistant Programme Officer) | ५४५ |
| ४ | एम.आय.एस. समन्वयक (MIS Co-ordinator) | ३५ |
| ५ | लिपिक व डेटा एन्ट्री ऑपरेटर | १०६९ |
| ६ | इतर संवर्ग (Other) | १०२ |
| | **एकूण कर्मचारी** | **२९६४** |





## रोजगार हमी योजनेची प्रशासकीय संरचना



# विभागीय व जिल्हास्तर संरचना



# सामाजिक अंकेक्षण

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सन २०१३ मध्ये सामाजिक अंकेक्षण करणेसाठी राज्य शासनाने सामाजिक अंकेक्षण संचालनालयाची स्थापना केली. तद्नंतर विविध योजनांचे सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी क्र.मग्रारो-२०१६/प्र.क्र.३२/रोहयो-६अ, दिनांक ४ डिसेंबर, २०१७ अन्वये महाराष्ट्र स्टेट सोसायटी फॉर सोशल ऑडिट अँड ट्रान्सपरन्सी (MS-SSAT) या नावाने सोसायटीची स्थापना करण्यात आलेली आहे. संस्था नोंदणी अधिनियम, १,८६० अंतर्गत सदर संस्थेची सहाय्यक धर्मादाय आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडील प्रमाणपत्र क्रमांकः जी.बी.बी.एस.डी. ९८/२०१८, दिनांक १७ जानेवारी, २०१८ अन्वये नोंदणी झालेली आहे.

२. सन २०२२-२३ या वर्षात सामाजिक अंकेक्षण कॅलेंडर मंजुरी ही मा.अपर मुख्य सचिव, (ग्राम विकास विभाग) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीचे नियामक मंडळ यांनी निधीच्या उपलब्धतेची शक्यता विचारात घेवून त्यानुसार राज्यातील १२,९६० ग्रामपंचायतींमध्ये रोहयोचे सामाजिक अंकेक्षण करण्याची मंजूरी देण्यात आलेली होती. तथापि दिनांक ३१ मार्च, २०२३ अखेर पर्यंत ग्रामविकास विभाग, मंत्रालय यांचेकडून सन २०२१-२२ साठी देय असलेला प्रलंबित निधी व सन २०२२-२३ साठी देय असलेला निधी यापैकी एकही निधी उपलब्ध झालेला नाही त्यामुळे सोसायटीकडे असलेला शिल्लक निधीतून २० तालुक्यातील १,२०० ग्रामपंचायतीमध्ये रोहयोचे सामाजिक अंकेक्षण करण्यात आले आहे.

३. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.१० मार्च, २०२२ रोजी घेतलेल्या लेबर बजेट बैठकीत राज्यातील १०० टक्के ग्रामपंचायतींचे सामाजिक अंकेक्षण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तथापि त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन दिलेला नाही.

४. महाराष्ट्र राज्यात १८ जिल्ह्यांतील २० तालुक्यातील १,२०० ग्राम पंचायतीचे सामाजिक अंकेक्षण पुर्ण करण्यात आले आहे. त्यावर सुमारे १.४० कोटी रुपये खर्च रोहयो विभागाने दिलेल्या अग्रीम रक्कमेतून तसेच सोसायटीच्या स्वनिधीतून करण्यात आला आहे.

५. सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या कोवीड कालावधीत १०,६९५ ग्रामपंचायतीत सामाजिक अंकेक्षण करण्यात आले होते. तथापि कोवीड निर्बधामुळे विशेष ग्रामसभा व जनसुनावण्या प्रलंबित होत्या हे प्रलंबित कामकाज दि. १० नोव्हेंबर, २०२२ ते दि. ४ डिसेंबर, २०२२ या कालावधीत पुर्ण करण्यात आले आहे. या जनसुनावणीमध्ये सामाजिक अंकेक्षणात आढळून आलेल्या बाबींचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | आर्थिक गैरव्यवहार | | आर्थिक अनियमितता | | प्रक्रिया उल्लंघन | | तक्रारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुद्दे | रक्कम रु. | मुद्दे | रक्कम रु. | मुद्दे | रक्कम रु. | मुद्दे | रक्कम रु. |
| २०२०-२१ | १४१ | १,१७,४४,४५६ | २,५४९ | ४६,६९,३९,०१५ | ३,६६६ | ४४,७३,३४,३८० | ३५९ | ३१,०५,१५० |
| २०२१-२२ | २०९ | १,३०,७१,८८८ | २,६६४ | २१,७०,२०,०४७ | ५,९४६ | ५,७५,७२,३६२ | ५१९ | १६,४६,८९९ |
| २०२२-२३ | १३० | १,७३,१८,४१८ | ६५६ | ९,८२,३२,८७५ | ९०० | १,०१,८४,८६१ | ८१ | ४,०३,६०१ |

६. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य यांच्या विनंतीनुसार रोहयोच्या प्रक्रियेसह प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण या १८ जिल्ह्यातील, २० तालुक्यातील ४०० ग्रामपंचायतीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण योजनांचेही सामाजिक अंकेक्षण करण्यात आले आहे.

## लोकांच्या प्रतिक्रिया :

फळबाग लागवड व वृक्ष लागवड या योजनेची कामे मोठया प्रमाणावर झाली असुन, ती फायदेशीर आहे.

पालघर या जिल्ह्यांतील पालघर व डहाणू या आदिवासी तालुक्यात तसेच लातूर, बीड, उस्मानाबाद व परभणी जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यात ही योजना लोकांसाठी फायदेशीर ठरली आहे.

बऱ्याच प्रमाणात या योजनेत तरुणांचा सहभाग वाढलेला आहे. पुर्वी या योजनेतून मिळणारी मजूरी अपुरी असल्यामुळे तरुणांचा सहभाग अत्यल्प होता. परंतु आता दिला जाणारा मजूरीचा दर व त्यातुन निर्माण होणारी स्थावर मत्ता यामुळे तरुण वर्गाचा या योजनेत सहभाग वाढलेला आहे.

रोहयो मध्ये रेन वॉटर हार्वेस्टींगचा सहभाग झाल्यास उपयोगी ठरु शकतो.

दशवार्षिक नियोजनामुळे गावांना भविष्यात समृध्द होण्याकरिता संधी प्राप्त झाली.

समृध्द योजनेंतर्गत “मी समृध्द तर गाव समृध्द” याद्वारे देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लोकांना फायदा झाला आहे. त्या अंतर्गत एका पेक्षा जास्त वैयक्तिक लाभाच्या कामांचा लाभ घेवून अनेक कुटुंब समृध्द होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत.

वित्त आयोगाच्या योजनाच्या अभिसरणातून सार्वजनिक जागेचे सुशोभिकरण व गाळ, अंतर्गत रस्ते यांची कामे मोठया प्रमाणावर होवून त्याचा फायदा गावांना होत आहे.

## सामाजिक अंकेक्षण सोसायटी पुढील आव्हाने :

महाराष्ट्रात २८,३६८ ग्राम पंचायती असुन कायद्यानुसार या प्रत्येक ग्रामपंचायतीचे वर्षातून २ वेळा सामाजिक अंकेक्षण करणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक निधी ग्राम विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून मिळत नाही.

सन २०१९-२० ते सन २०२२-२३ मध्ये मिळालेला निधी व झालेल्या खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | MoRD कडून प्राप्त निधी | सामाजिक अंकेक्षणावर झालेला खर्च रु. | अंकेक्षण केलेल्या ग्रा.पं.संख्या |
|---|---|---|---|
| २०१८-१९ | ४,५५,२१,००० (प्राप्त दि.०५/०४/२०१९) | ५,२४,१०,२२५ | २,००१ |
| २०१९-२० | ५,९६,०७,००० (प्राप्त दि.१९/०३/२०२०) | ५,२९,१०,००० | ३,१७९ |
| २०२०-२१ | ४,४२,३९,००० (प्राप्त दि.२९/०७/२०२१) | ३,४६,९७,००० | ५,३२९ |
| २०२१-२२ | निधी प्राप्त झाला नाही. | ५,९१,७२,००० | ५,३६६ |
| २०२२-२३ | निधी प्राप्त झाला नाही. | १,३७,६८,८०० | १,२०० |

जिल्हा तक्रार निवारण अधिकारी आणि ग्राम रोजगार सेवक यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रशिक्षण नसल्यामुळे हे दोन्ही घटक सक्षमपणे काम करु शकत नाही.

सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी जिल्हा साधन व्यक्ती/तालुका साधन व्यक्ती यांना या पदावर निश्चित कालावधीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या बाह्यस्त्रोतामार्फत CSC-E Governaces Services India Ltd., या संस्थेमार्फत नियुक्ती करुन त्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

सामाजिक अंकेक्षण कक्षातील कामकाजासाठी पॅनलवर असलेल्या जिल्हा साधन व्यक्ती यांची संख्या पुरेशी नसल्याने, माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये २५ उमेदवारांची जिल्हा साधन व्यक्ती पदावर निवड करण्यात आली आहे. या उमेदवारांना विहित एक महिन्याचे प्रशिक्षण देवून सोसायटीच्या पॅनलवर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

## सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीद्वारे सन २०२२-२३ मध्ये पाच विभागातील अंकेक्षण झालेल्या ग्रामपंचायतीचा अहवाल

### विवरणपत्र - अ

| क्र. | विभाग | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायत (संख्या) |
|---|---|---|---|---|
| १. | अमरावती | बुलढाणा | नांदुरा | ६० |
| २. | | अकोला | अकोट | ६० |
| ३. | | यवतमाळ | बाभुळगांव | ६० |
| ४. | | अमरावती | धामणगांव | ६० |
| ५. | औरंगाबाद | उस्मानाबाद | तुळजापूर | ६० |
| ६. | | बीड | अंबाजोगाई | ६० |
| ७. | | लातूर | निलंगा | ६० |
| ८. | | जालना | परतूर | ६० |
| ९. | | नांदेड | भोकर | ६० |
| १०. | | हिंगोली | हिंगोली | ६० |
| ११. | | औरंगाबाद | वैजापूर व औरंगाबाद | १२० |
| १२. | नागपूर | गोंदिया | अर्जुनी मोरगांव व सडक अर्जुनी | १२० |
| १३. | | वर्धा | समुद्रपूर | ६० |
| १४. | | भंडारा | लाखणी | ६० |
| १५. | | चंद्रपूर | सावली व पोंभुर्णा | ६० |
| १६. | नाशिक | धुळे | धुळे | ६० |
| १७. | | जळगांव | जळगांव | ६० |
| १८. | पुणे | सांगली | जत | ६० |
| एकूण | ५ विभाग | १८ जिल्हे | २० तालुके | १२०० ग्रा.पं. |

# तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsman)

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा लाभ मजुरांना मिळावा, त्यामध्ये पारदर्शकता असावी, मजुरांच्या तक्रारीचे निराकरण व्हावे, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, याकरीता सदर कायद्याच्या कलम २७ (१) नुसार प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी तक्रार निवारण प्राधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचे निर्देश केंद्र शासनाने दि.७ सप्टेंबर, २००९ च्या आदेशान्वये दिलेले आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक जिल्ह्यात तक्रार निवारण प्राधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. केंद्र शासनाने दि.२४ मे, २०१३ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यामध्ये तक्रार निवारण प्राधिकारी यांची वयोमर्यादा ६८ वर्षापर्यंत करण्यात आलेली आहेत. केंद्र शासनाच्या दि.२८/०८/२०१७ रोजीच्या पत्रान्वये निर्गमीत केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांनूसार लोकप्रशासन, विधी, शिक्षण, सामाजिक कार्य किंवा व्यवस्थापन क्षेत्रात किमान १० वर्षे सेवा झालेल्या व्यक्तीची तक्रार निवारण प्राधिकारी या पदावर प्रथमतः २ वर्षाकरिता नियुक्ती करण्यात येते. त्यांचे काम समाधानकारक असल्यास त्यांना एकावेळी एक असे कमाल दोन वर्षापर्यंत मुदतवाढ देण्याची तरतूद आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार तक्रार निवारण प्राधिकारी यांच्या बैठक भत्त्यांत रु.१०००/- वरुन रु.२२५०/- (प्रति बैठक) एवढी वाढ करण्यात आलेली आहे.

तक्रार निवारण प्राधिकारी यांना जिल्हा स्तरावर दैनंदिन कामकाज करताना उद्‌भवणाऱ्या अडचणींबाबत विचारविनिमय करण्यात आला आहे. त्यांच्या कामात सुसूत्रता येण्यासाठी त्यांना कोणत्या कार्यालयीन सुविधा अनुज्ञेय असतील, त्यांनी कोणत्या तक्रारींचे निवारण करावे, अहवाल कोणास सादर करावा याबाबतच्या सविस्तर सूचना शासन परिपत्रक दिनांक १४ ऑगस्ट, २०१३ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

अर्जदारास तक्रार निवारण प्राधिकारी यांचा निर्णय अमान्य असल्यास अथवा सदर निर्णयाने समाधान होत नसल्यास तक्रार निवारण प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुध्द अपिल करण्याची तरतूद आहे. सदर अपिलावर निर्णय घेण्यासाठी शासन निर्णय दि. २७/०७/२०१४ अन्वये राज्यस्तरावर अपिलीय प्राधिकरण गठीत करण्यात आली आहे. केंद्र शासनाने अपिलीय प्राधिकरणातील अध्यक्ष व सदस्य यांना प्रत्येक बैठकीसाठी रु.२५००/- इतका बैठक भत्ता प्रतीमाह कमाल २० बैठकाकरिता अनुज्ञेय केला आहे.

# महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ अंतर्गत शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. रोहप-२००५/प्र.१७९/रोहयो-८, दि. ०४.०१.२००६ अन्वये मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद' ची पुनर्रचना, शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र, मग्रारोहयो-२०११/प्र.क्र.८६/रोहयो-१० दि. १३.१०.२०११ अन्वये करण्यात आली असून महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषदेचे सदस्य पुढील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा.मुख्यमंत्री | - | अध्यक्ष |
| २) | मा.उप मुख्यमंत्री | - | उपाध्यक्ष |
| ३) | मा.मंत्री (रोहयो) | - | कार्यकारी अध्यक्ष |
| ४) | मा.मंत्री (ग्रामविकास) | - | सदस्य |
| ५) | मा.मंत्री (जलसंधारण) | - | सदस्य |
| ६) | मा.मंत्री (कृषी) | - | सदस्य |
| ७) | मा.राज्यमंत्री (रोहयो) | - | सदस्य |
| ८) | मा.प्रधान सचिव (रोहयो व जलसंधारण) | - | सदस्य सचिव |
| ९) | प्रधान सचिव (ग्रामविकास) | - | सदस्य |
| १०) | प्रधान सचिव (नियोजन) | - | सदस्य |
| ११) | प्रधान सचिव (कृषी) | - | सदस्य |
| १२) | आयुक्त (MGNREGS) | - | सदस्य |

तसेच महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषदेवर महाराष्ट्र राज्य रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सुधारणा २००६) कलम ४ (१) नुसार जास्तीत जास्त १५ अशासकीय सदस्य राज्य शासन नामनिर्देशित करेल.

ते पंचायतराज संस्था, कामगार संघटना, लाभवंचित गटामधील (Disadvantaged groups) असावेत.

त्यापैकी किमान १/३ महिला सदस्य असतील.

तसेच किमान १/३ सदस्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि अल्पसंख्यांक मधील असतील.

महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषदेची कार्यकक्षा महाराष्ट्र राज्य रोजगार हमी अधिनियम, १९७७ (सुधारणा २००६) कलम चार (३) नुसार राहील. राज्य रोजगार हमी परिषदेची कर्तव्ये व कामे पुढीलप्रमाणे असतील.

१. राज्य शासनास योजनेच्या अंमलबजावणी व इतर बाबींबाबत सल्ला देणे, अग्रक्रमाने हाती घ्यावयाची कामे निश्चित करुन त्याची यादी तयार करणे,

२. या अधिनियमातील व त्याखालील आखण्यात आलेल्या योजना यांचे सनियंत्रण व गा-हाणी दूर करणारी यंत्रणा यांचा वेळोवेळी आढावा घेणे व त्यात सुधारणा सुचविणे, तसेच योजनेविषयी व्यापक प्रसार करणे,

३. अधिनियम व योजना अंमलबजावणीचे सनियंत्रण करणे,

४. विधानमंडळापुढे सादर करण्यासाठी वार्षिक अहवाल तयार करणे,

५. राज्य शासनाकडून नेमून देण्यात आलेली कर्तव्य किंवा कार्य पार पाडणे.

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनांचे मुल्यनिर्धारण करण्याचा आणि त्याअनुषंगाने ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या संदर्भातील सांख्यिकी माहिती गोळा करण्याचा तसेच योजना व कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषदेला असेल.

## पारदर्शकता व सक्षमीकरण

योजनेमध्ये अधिकाधिक पारदर्शकता निर्माण करणे, मजुरांना योजनेची पूर्ण माहिती व्हावी तसेच मजुरांचा जास्तीत जास्त सहभाग वाढावा याकरिता राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी ग्रामरोजगार दिवसाचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. यादिवशी मजूर नोंदणी करणे, कामाची मागणी करणे, बँक/पोस्टात खाती उघडणे, नवीन कामाविषयी माहिती घेणे, योजनेसंबंधी इतर विषयावर मजुरांना मार्गदर्शन करणे इत्यादी गोष्टी केल्या जातात.

योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अधिक पारदर्शकता निर्माण व्हावी व मजुरांना त्यांच्या मजुरीबाबत सविस्तर माहिती मिळावी यासाठी ग्रामरोजगार सेवकामार्फत प्रत्येक मजुराला वेतनचिठ्ठीचे (Pay Slip) वाटप करण्यात येते. यामध्ये हजेरीपत्रक क्रमांक, कालावधी, मजुरीची रक्कम, बँक अथवा पोस्टात पाठविल्याचा दिनांक इत्यादींचा समावेश असतो.











महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत महिला मजुरांचे सक्षमीकरण व सबलीकरण करण्यासाठी तसेच केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर निर्देश देण्यात आले. सदरील मार्गदर्शक सूचनांन्वये, महिला मजूरांच्या नावाचे स्वतंत्र खाते बँकेत किंवा पोस्ट ऑफिसमध्ये उघडणे बंधनकारक आहे. त्यांनी काम केलेल्या दिवसांची मजुरी त्यांच्या नावे उघडण्यात आलेल्या स्वतंत्र खात्यात टाकण्यात यावी. विधवा, परित्यक्ता व निराधार महिलांना जॉबकार्ड पुरवणे व मजुरी उपलब्ध करुण देणे इत्यादी मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

योजनेंतर्गत मजुरांना मस्टर बंद झाल्यानंतर १५ दिवसांत मजुरी अदा करण्यात आली नाही तर मजुरीच्या प्रदानामध्ये होणाऱ्या विलंबासाठी मस्टर बंद झाल्यानंतर १६ व्या दिवसापासून प्रतिदिवस देय मजुरीवर ०.०५ टक्के विलंब आकार मजुरांना देण्यात येत आहे.

महात्मा गांधी नरेगा व इतर विभागाच्या योजनांचे अभिसरण करुन शौचालयाची कामे, रेशीम मातृवृक्षांच्या लागवडीची कामे, रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड, सिंचनाची सुविधा पुरविणे, मृदसंधारणाची व पाणलोटाची कामे, अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम इत्यादी कामाकरिता शासनाने मान्यता दिलेली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागामार्फत मत्स्यसंवर्धन विषयक पोर्टेबल हॅचरी ओटा, मत्स्यप्रजनक साठवणूक तळी व मत्स्यबोटुकली संवर्धन तळी तयार करण्याची कामे कृषि व पदुम विभागामार्फत राबविण्यास दि. ५ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काही योजनांच्या संयोजनातून दि. ०३ फेब्रुवारी, २०२१ च्या शासन निर्णयान्वये 'शरद पवार ग्राम समृध्दी' राज्य योजना राबविण्यास शासन मान्यता मिळाली आहे. सदर योजनेंतर्गत गुरांसाठी पक्का गोठा बांधणे, शेळीपालन शेड बांधणे, कुक्कुटपालन शेड बांधणे, भूसंजीवनी नाडेप कंपोस्टींग, शेततळे, शोष खड्डे इत्यादी कामे संयोजनातून करण्यात येतात.

# मातोश्री ग्राम समृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना

शासन निर्णय दि.११/११/२०२१ अन्वये 'पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते' योजनेचे नामकरण 'मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना'असे करण्यात आले असून सदर योजना अधिक सुटसुटीत करण्यात आली आहे. शेत/पाणंद रस्ते हे प्रामुख्याने शेतीमधील कामाकरीता आवश्यक असणारे साधनांची ने-आण करण्याकरीता उपयोगात येतात. पावसाळयात शेत/पाणंद रस्ते सुयोग्य असणे गरजेचे आहे.पावसाळयामध्ये शेतीसाठी आवश्यक असणा-या यंत्रसामुग्रीची वाहतुक शेत/पाणंद रस्ते योजनेमुळे सुकर झाली आहे. या योजनेनुसार राज्यात शेत/पाणंद रस्ते तयार करणे, शेतरस्त्यावरील अतिक्रमण काढणे. माती, दगड, मुरुम व खडी टाकून शेतरस्त्याचे मजबूतीकरण करणे इत्यादी कामे केली जातात.






# सुविधा संपन्न कुटुंब मिशन आणि सर्वांगीन ग्रामसमृध्दी योजना

निती आयोगाने सप्टेंबर २०२१ मध्ये बहुआयामी गरीबी निर्देशांक (Multidimensional Poverty Index - MPI) प्रकाशित केला आहे. त्यात आरोग्य, शिक्षण व राहणीमान निकषांनुसार कुटुंबे वंचित असल्यास सर्व निकषांचा एकत्रितरित्या विचार करुन, प्रत्येक निकषाला भारांश देऊन, गणना करुन आणि त्यास कट-ऑफ लावून गरीबीची तीव्रता आणि गरीबीखाली जगत असलेल्या कुटुंबांची संख्या आणि टक्केवारी काढली आहे. त्यानुसार राज्यात अजुनही १४.९ टक्के लोक कोणत्याही एक किंवा अनेक प्रकारच्या वंचिततेनुसार गरीब असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाच्या योजना ह्या कुटुंबांच्या कोणत्यातरी एक किंवा अनेक प्रकारच्या वंचिततेवर मात करण्याच्या अनुषंगाने सुरु करण्यात आलेल्या आहेत. या योजनांची मनरेगा योजनेशी अभिसरण (वैचारीक/निधी/मनुष्यबळ) केल्यास केंद्र शासनामार्फत अधिकचा निधी प्राप्त होऊन राज्य शासनाच्या उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये योजनांचे उद्दिष्ट आणि व्याप्ती यामध्ये वाढ होईल. या उद्देशाने मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार शासननिर्णय दिनांक १४ डिसेंबर, २०२२ अन्वये मरनेगा आणि अन्य विभागांच्या योजना यांच्या अभिसरणातुन 'सुविधा संपन्न कुटुंब मिशन' आणि "सर्वांगीण ग्रामसमृध्दी योजना" राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.सदर योजनेची खालील नमूद वैशिष्टे आहेत.

१) मनरेगा आणि विविध विभागांच्या योजनांच्या अभिसरणातून सुविधा संपन्न कुटुंब मिशन आणि सर्वांगीण ग्रामसमृध्दी योजना राबविणे.

२) प्रत्येक विभागातील स्वयंप्रेरित व उत्कृष्ट असे कार्य करणारे अधिकारी आणि कर्मचारी यांनी दत्तक घ्यावयाच्या गावांना नंदादीप गावे संबोधुन योजना राबविणे.

३) नंदादीप गावांप्रमाणेच काही तालुक्यांना नंदादीप तालुके संबोधून योजना राबविणे.

## महत्वाची वैशिष्ट्यपूर्ण कामे

**अ. वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक शेतजमिनीवर कृषि विभागामार्फत फळबाग लागवड कार्यक्रमः-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक शेतजमिनीवर कृषि विभागामार्फत फळबाग लागवड कार्यक्रम २० सप्टेंबर २०२२ च्या शा.नि.मध्ये नमुद केल्याप्रमाणे दि.२० मार्च २०१२, १४ मार्च २०१२ व १२ एप्रिल २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये लागु करण्यात आलेले आर्थिक व तांत्रिक मापदंड सध्या लागू राहतील. फळबाग लागवडीमध्ये १५ डिसेंबर २०२२ अन्वये केळी (३ वर्षे), ड्रॅगनफ्रुट, ॲव्हॅकॅडो, द्राक्ष व फुलपिके-सोनचाफा तसेच मसाल्याची पिके-लवंग, दालचिनी, मिरी व जायफळ इ. पिकांचा समावेश करण्यात आला आहे.

**ब. वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर कृषि विभागामार्फत फुल पिके लागवड कार्यक्रमः-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतीवर कृषि विभागामार्फत फुल पिके लागवड कार्यक्रम दिनांक १ ऑक्टोबर, २०२० पासून सुरु करण्यात आला असून सदर योजनेअंतर्गत निशिगंध, मोगरा, गुलाब या फुल पिकांची लागवड करण्यात येते.

**क. शेततळयांचे अस्तरीकरण कार्यक्रमः-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत शेततळ्यांच्या अस्तरीकरणास दिनांक ३ एप्रिल, २०२० शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेली आहे. ज्यामध्ये प्लास्टीक अस्तरीकरण फिल्म दिल्याने पावसाळयामध्ये पडणारे पावसाचे पाणी साठवून ठेवता येईल व संरक्षीत ओलितामुळे पावसात खंड पडला तरी पिकांना योग्य पाणी पुरवठा झाल्यास शेतकऱ्यांच्या पिकांचे आर्थिक नुकसान होणार नाही.

**ड. जलशक्ती अभियान :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून जलशक्ती अभियान शासन परिपत्रक दिनांक २२.३.२०२१ पासून राबविण्यात आले आहे. सदर अभियानाअंतर्गत (१) जलसंधारण व रेन वॉटर हार्वेस्टींग, (२) पारंपारीक तसेच जलस्त्रोताचे नुतनीकरण, (३) पाण्याचा पुर्नवापर आणि स्त्रोतांचे पुनर्भरण, (४) पाणलोट विकास, (५) गहन वृक्षारोपण इत्यादी कामे जलशक्ती अभियानामार्फत राबवून शेतक-यांच्या शेतात शेततळे बांधून त्याच्या पाण्याचा किफायतशीर वापर (ठिबक/तुषार सिंचन) ज्यामुळे फळबाग, मत्स्यव्यवसाय इत्यादी अनेक कृषि उत्पन्नात दिवसेंदिवस वाढ होत आहे.

**इ. शेतक-यांच्या शेत जमिनीवर ग्रामपंचायती मार्फत वृक्ष लागवडः-**

वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेताच्या बांध्यावर व शेतक-यांच्या शेत जमिनीवर वन विभागाच्या सामाजिक वनीकरण शाखेमार्फत वृक्ष लागवड कार्यक्रमाअंतर्गत शासन निर्णय, दिनांक १२.४.२०१८ मुद्दा क्रमांक १.७ मधील वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता अट रद्द करुन त्यामध्ये सदर कामे ग्रामपंचायतीकडून करुन घेण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यास तसेच

पंचायत समिती मधील कृषि अधिका-यांकडून तांत्रिक मान्यता द्यावी. गट विकास अधिकारी यांची प्रशासकीय मान्यता द्यावी अशी सुधारणा करण्यात आली.

## SECURE (Software for estimate calculation using rural rates for employment):-

SECURE Software हे web-based application असून मनरेगाची प्राकलने बनवण्याकरिता केंद्र शासनाच्या MoRD विभागाकडून तयार करण्यात आले आहे. सदर software मध्ये मनरेगा ची अकुशल दर सूची, PWD च्या व जलसंधारणाच्या बाबी आहेत.

सदर Software मध्ये मनरेगा मधील सर्व अनुज्ञेय कामांची प्राकलने नियमित बनविण्यात येतात. प्राकलने बनविणे व त्यास मंजुरी देणे ही सगळी कामे SECURE Software मधूनच होतात. सदर Software मुळे कुठले काम कुठल्या स्तरावर प्रलंबीत आहे याची सखोल माहिती मिळते. सदर Software मध्ये आर्थिक वर्ष बदलल्यास दरपत्रक बदलवण्याची सोय आहे.

नरेगा Soft मधून कामाचा संकेतांक SECURE मध्ये येतो. SECURE मधून प्रशासकीय मान्यता घेतल्यावर काम Geo tagging साठी उपलब्ध होते व नंतर त्यांचे Muster काढून कामे करता येतात. चालू आर्थिक वर्षाची प्राकलने सुधारीत करण्याची सोय SECURE मध्ये आहे. अशा प्रकारे SECURE Software मुळे कामात सुसूत्रता येते व कामामध्ये पारदर्शकता निर्माण होऊन कामांचा वेगही वाढला आहे. तसेच कामामध्ये होत असलेली अनियमितता सुध्दा नियंत्रीत होत आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात एकूण १,७२,३८५ ग्रामपंचायत यंत्रणेच्या विविध कामांना SECURE प्रणालीमध्ये अंदाजपत्रके तयार करुन प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

## मिशन अमृत सरोवर :

स्वातंत्र्य भारताच्या अमृत महोत्सवी देशात मोठ्या संख्येने अमृत सरोवरांची निर्मिती करण्याचा संकल्प देशाचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी केला आहे. राज्यात सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात एकूण ३१४३ कामांची स्थळे निवडण्यात आली. त्यापैकी दि.३१ मार्च, २०२३ अखेर एकूण १५०० अमृत सरोवरांची कामे पूर्ण झाली असून ७७९ कामे प्रगतीपथावर होती.

## अभिसरण :

शासन निर्णय दिनांक ५.११.२०१८ नुसार इतर योजनेसोबत मनरेगातील कामांचे अभिसरण करुन मत्ता तयार करता येते. यामध्ये प्राकलनाची पूर्ण अकुशल किंमत मनरेगामधून मस्टर द्वारे मजुरांना अदा करण्यात येते. प्राकलनातील पूर्ण अकुशल बाबींना व त्याच्या रकमेला Part-A म्हणतात. सदर रकमेस ६०% असे गणण्यात येते. या ६०% रकमेच्या ४०% रक्कम कुशल स्वरुपाच्या बाबींकरिता मनरेगामधूनच अदा करण्यात येते. सदर कुशल बाबींना व त्यांच्या एकूण रकमेला Part-B असे संबोंधण्यात येते. उर्वरीत पुर्ण कुशल बाबी व त्यांची एकूण रक्कम यांना Part-C

असे म्हणतात. Part-C मधील रक्कम सदर कामांची अंमलबजावणी यंत्रणेने अदा करावयाची आहे. अशा प्रकाराचे इतर यंत्रणेसोबत मरनेगाचे अभिसरण केल्यास अधीक मत्तांची निर्मिती होऊ शकते. शासन निर्णय, दिनांक ३०.३.२०२१ नुसार मनरेगातील सर्व अनुज्ञेय कामे अभिसरणातून करता येतील. तसेच अभिसरण आराखडा तयार करुन अपेक्षीत कामाचा नमुना अंदाजपत्रकाला मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा समितीला प्रदान करण्यात येत आहे, जेणेकरुन कामाची अंमलबजावणीची गती वाढविण्यास मदत होत आहे.

## प्रचार व प्रसिध्दी

### योजनेची जाणीव-जागृती करणे विषयीचे उपक्रम :-

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्त दि. १५ ऑगस्ट, २०२२ रोजी नागपूर येथे आयोजित शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते मनरेगा आयुक्तालय मार्फत तयार करण्यात आलेल्या **"महाराष्ट्रातील अमृत सरोवर"** पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. याप्रसंगी नागपूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती रश्मी बर्वे, विभागीय आयुक्त श्रीमती विजयलक्ष्मी बिदरी, भा.प्र.से, जिल्हाधिकारी श्रीमती आर विमला, भा.प्र.से, मनरेगा आयुक्त श्री.शांतनु गोयल, भा.प्र.से. आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.



महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत **'झेप अभिमानाची स्वाभिमानाने जगण्याची'** या कार्यक्रमाचे आयोजन दि. ३ मार्च, २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह मुंबई येथे करण्यात आले. या कार्यक्रमात **"यशोगाथा कुटुंब आणि ग्राम समृध्दीची"** या मनरेगा यशोगाथा पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच, मनरेगा अंतर्गत योजनेची क्षेत्रियस्तरावर अंमलबजावणी करणाऱ्या कर्तव्यतत्पर आणि महत्त्वपूर्ण कामगिरी

केलेल्या अधिकारी व कर्मचा-यांचा सन्मान राज्याचे मा.राज्यपाल श्री.रमेश बैस व मा.मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी मा.मंत्री रोहयो व फलोत्पादन, श्री. संदिपान भूमरे, मा.आमदार श्री. आशिष जैस्वाल, मा.आ.श्री.महेंद्र दळवी, रोहयो विभागाचे प्रधान सचिव श्री. नंद कुमार, मनरेगा आयुक्त श्री. शांतनू गोयल आणि राज्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.






# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत क्षमता बांधणी कार्यक्रम

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, आयुक्तालय, नागपूर मार्फत सन २०२२-२३ मध्ये महाराष्ट्रातील (राज्यस्तरावर) सर्व विभागांसाठी तसेच जिल्ह्यांसाठी व तालुकास्तरावर विविध प्रशिक्षणातील विषयांकरिता वेळोवेळी कार्यशाळा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने राज्यातील मनरेगा अंतर्गत समाविष्ट असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या क्षमता बांधणीवर विशेष प्राधान्य देण्यात आले.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणी करण्याकरिता संसाधन व्यक्ती/मास्टर ट्रेनर यांचे मार्फत सर्व जिल्हा तसेच तालुकास्तरावर विविध प्रशिक्षण सन २०२२-२३ या वर्षात घेण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने मनरेगामध्ये समाविष्ट असणारे विविध विभाग प्रामुख्याने (तांत्रिक/कृषी/पंचायत/MIS) तसेच विविध स्वयंसेवी संस्था, मृद व जलसंधारण विभाग यांना मनरेगा योजनेबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

सदर प्रशिक्षणा मध्ये मनरेगा मधील विविध संकल्पना, घटक, विषय तसेच संवाद सभा, कार्यशाळा, गाव समृध्द योजना, दशवार्षिक योजना, लखपति संकल्पना व मृद व जलसंधारण मधील विविध बाबींचा विशेषतः समावेश करण्यात आला. राज्य सरकारने आखून दिलेल्या कोविड परिस्थितीच्या दिशा-निर्देशानुसार काही प्रशिक्षणे ऑनलाईन घेण्यात आले. प्रशिक्षणार्थ्यांची संख्या सोबत संलग्न आहे.

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत मनरेगा GIZ प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत यवतमाळ जिल्ह्यातील तांत्रिक सहाय्यक यांचे दोन दिवसीय कार्यशाळा जिल्हा परिषद सभागृह यवतमाळ येथे दिनांक १६/०२/२०२३ ते १७/०२/२०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आली असून सदर प्रशिक्षणास एकूण २० प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत मनरेगा अंतर्गत ARMS auditor/ संविधानिक लेख लेखापरीक्षक व सहाय्यक लेखा अधिकारी यांचे विभागनिहाय लेखाविषयक प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती येथे दिनांक २२/०३/२०२३ ते २४/०३/२०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आले. सदर प्रशिक्षणास एकूण ८२ प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत तक्रार निवारण पोर्टल बाबत ऑनलाईन प्रशिक्षण दिनांक २७/०३/२०२३ रोजी आयोजित केले असून सदर प्रशिक्षणास एकूण १७० प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत तक्रार निवारण प्राधिकारी यांचे आयुक्तालय नागपूर येथे एक दिवसीय प्रशिक्षण दिनांक १३/०४/२०२३ रोजी आयोजित केले असून सदर प्रशिक्षणास एकूण १५ प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

५. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत मनरेगा अंतर्गत BRLF व मनरेगा विभागाची मा.अपर मुख्य सचिव (रोहयो) महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दोन दिवसीय कार्यशाळा प्रबोधिनी, अमरावती येथे आयोजित करण्यात आले.

६. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत मनरेगा अंतर्गत मा.मंत्री (रोहयो), मा.अपर मुख्य सचिव ग्राम विकास व मा.अप्पर मुख्य सचिव रोहयो अध्यक्षतेखाली वंचितता निर्मुलन मिशन राबविणेबाबत राज्यातील सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गट विकास अधिकारी व सहाय्यक गट विकास अधिकारी यांची एक दिवसीय कार्यशाळा औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आली असून सदर प्रशिक्षणास एकूण ६५० प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला.





## योजनेस चालना देण्याकरिता करण्यात आलेल्या उपाययोजना

योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन द्यावी तसेच, योजनेविषयी माहिती देण्यासाठी केंद्रशासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक महिन्यातील पहिल्या शनिवारी ग्रामरोजगार दिन आयोजित करण्यात येतो. ग्रामीण मजुरांना इतरही योजनांची माहिती व योजनांचे प्रत्यक्ष लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करुन दिल्यास ग्रामरोजगार दिवसाचे आयोजन अधिक लाभदायक ठरेल ही बाब विचारात घेऊन **"एक दिवस मजुरासोबत"** या संकल्पनेंतर्गत दिनांक ३० एप्रिल व दिनांक १ ऑक्टोबर या दिनांकास म्हणजे वर्षभरात दोनदा **"ग्रामरोजगार दिनी"** विविध उपक्रम, योजनेंतर्गत मोठया प्रमाणावर हाती घेण्यात आलेली व मोठया प्रमाणात मजुर उपस्थिती असलेली गावे तसेच, जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवडण्यात आलेली गावे यामध्ये आयोजित करण्याचा निर्णय शासनाने घेतला. सदरील उपक्रमांतर्गत योजनेची माहिती व कामे, वैयक्तिक लाभाच्या योजना, जनजागृतीच्या योजना यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ अंतर्गत कलम १२ ड नुसार नागरी क्षेत्रामध्ये रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करण्याची तरतूद असून उक्त अधिनियमाच्या २ म (१) नुसार नागरी क्षेत्र म्हणजे "क" वर्ग नगरपरिषदेचे किंवा नगरपंचायतीचे स्थानिक क्षेत्र असा आहे. त्या अनुषंगाने नियोजन (रोहयो) प्रभागाची अधिसूचना दिनांक ०४ डिसेंबर, २०१४ अन्वये राज्यातील "क" वर्ग नगरपरिषद/नगरपंचायतीमध्ये रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करण्याची अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक (०३ मार्च, २०१४ अन्वये महाराष्ट्रात 'क' वर्ग नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रात राज्य रोजगार हमी योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत तपशीलवार सूचना देण्यात आल्या आहेत.)

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रेशीम उद्योग विकास योजना संपूर्ण राज्यात राबविण्यास तसेच तुती लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना रेशीम किटक संगोपन गृहाचे बांधकाम करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

योजनेंतर्गत कृषि विभागामार्फत भूस्तराप्रमाणे शेततळे खोदण्याचा कार्यक्रम अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या/विमुक्त जमाती, दारिद्र्य रेषेखालील इतर कुटुंबे, महिलाप्रधान / शारीरिक अपंगत्व प्रधान असलेली कुटुंबे, भुसूधार योजनेचे लाभार्थी, इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी इत्यादी प्रवर्गातील लाभधारक शेतकऱ्यांच्या शेतात राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ (नरेगा) ऑपरेशनल मार्गदर्शक सूचना मधील परिच्छेद १०.१.२ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, या कार्यक्रमांतर्गत कामे सुरु असतांना, कामांची प्रगती आणि गुणवत्ता यांच्या संनियंत्रणाखाली जिथे कामे चालु आहेत तेथील स्थानिक लोकांचा सहभाग असलेली ग्रामपंचायत स्तरावर स्थानिक देखरेख व दक्षता समिती गठीत करण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार नरेगा अतंर्गत ग्रामपंचायत स्तरावर देखरेख व दक्षता समिती गठीत करण्यात आली आहे.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र तक्रार निवारण (सुधारणा) नियम, २०२३**

"महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अंतर्गत सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत शासकीय सेवकाच्या बाबतीत शिस्तभंगाची कारवाई सुरु करेल आणि अशासकीय सेवकाच्या बाबतीत त्यांची तात्काळ सेवा समाप्त करुन आर्थिक गैरव्यवहारातील रक्कम वसूल करण्यात येईल.

अशा दखलपात्र गुन्ह्याचा प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी घेतली आहे याची तो खात्री करेल." अशी सुधारणा करण्यात आली आहे.

# मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील टास्क फोर्स

रोजगार हमी योजनेअंतर्गत देण्यात येणा-या विविध योजनांचा लाभ इतर विभागांच्या योजनांशी समन्वय पध्दतीने देण्यासाठी दि. ३१ मे, २०२२ च्या शासन निर्णयान्वये मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली टास्क फोर्स गठीत करण्यात आले आहे त्याची संरचना खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विभाग | टास्क फोर्स मधील पद |
|---|---|---|
| १. | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, कृषी विभाग | सदस्य |
| ३. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, जलसंधारण विभाग | सदस्य |
| ४. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ५. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ६. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, पशुसंवर्धन, दुग्ध पालन व मत्स्य संवधर्न विभाग | सदस्य |
| ७. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, उर्जा विभाग | सदस्य |
| ८. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग | सदस्य |
| ९. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| १०. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, पर्यावरण विभाग | सदस्य |
| ११. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, वने | सदस्य |
| १२. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल | सदस्य |
| १३. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| १४. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग | सदस्य |
| १५. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| १६. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| १७. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, महिला व बालविकास विभाग | सदस्य |
| १८. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विकास विभाग | सदस्य |
| १९. | सचिव/प्रधान सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, रोहयो | सदस्य सचिव |

**योजनेस चालना देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा.२०) मधील कलम १७ च्या पोट कलम (१) अन्वये पुढील नियम प्रसिध्द करण्यात आलेः**

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये विधिमंडळाच्या जून, २०१४ च्या अधिवेशनात मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात आल्या. त्यानुसार, सदर सुधारणा महाराष्ट्र राजपत्रामध्ये दि.२६ जून, २०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या. या नवीन सुधारणांचा समावेश करुन दि. ६ ऑगस्ट, २०१४ पर्यत अद्ययावत असलेला महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ प्रसिध्द करण्यात आला.

सदर अधिनियम दिनांक २५ जुलै, २०१४ पासून अंमलात आल्याबाबतची अधिसूचना निर्गमित. (दि. २४ जुलै, २०१४ चे शासन राजपत्र)

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा. २०) मधील कलम १७ च्या पोटकलम (१) याद्वारे महाराष्ट्र तक्रार निवारण नियम, २०१४ हे नियम दि. ४ जुलै, २०१४ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले.

## योजनेची फलनिष्पत्ती

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र ही योजना राज्यात अति लोकप्रिय ठरली आहे. या योजनेंतर्गत विविध नाविन्यपूर्ण कल्पक नियोजन व अंमलबजावणी केल्याने जसे की, क्षेत्रीय स्तरावरील कार्यान्वयीन यंत्रणामध्ये व्यापक जागृती, कर्मचा-यांचे प्रभावी प्रशिक्षण, कार्यपध्दतीचे सुलभीकरण, प्रशासकीय सुधारणा, एम.आय.एस. बळकटीकरण, ई-मस्टरची अंमलबजावणी, इ.एफ.एम.एस कार्यप्रणालीचा अवलंब, बाह्यस्थ मनुष्यबळाची सेवा इत्यादी केल्याने ही योजना सर्वसामान्य माणसांपर्यत पोहचली आहे. सदर योजनेंतर्गत रोजगार पुरविणे, त्या अनुषंगाने जीवनमान सुरक्षा प्रदान करणे व स्थायी मालमत्ता निर्माण करणे या उद्दिष्टांच्या अनुषंगाने गावांचा संपूर्ण विकास होऊ शकतो. या योजनेच्या माध्यमातून गावे स्वयंपूर्ण करुन ग्रामीण भागाच्या विकासाच्या मुलभूत संकल्पनेस चालना मिळत आहे. ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक जीवनमानात कायापालट होण्याकरिता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र ही योजना निश्चितच उपयुक्त ठरत आहे.

या योजनेंतर्गत पुरुष व महिला मजुरांना समान मजुरी अदा करण्यात येते, त्यामुळे स्त्री-पुरुष भेदभाव नष्ट होण्यास चालना मिळते.

योजनेंतर्गत मजूरांना स्थानिक ठिकाणी कामे मिळत असल्याने कामासाठी स्थलांतरीत होण्याच्या प्रमाणात घट झालेली आहे.

सन २०२२-२३ मध्ये सुमारे २८००० पेक्षा जास्त ग्रामपंचायत क्षेत्रात योजनेंतर्गत कामे सुरु होती.

योजनेंतर्गत सन २०२२-२३ या वर्षामध्ये २१.२१ लाख कुटुंबातील एकूण ३७.०७ लाख मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला. यामध्ये महिलांचा मोठा सहभाग असून, १६.५० लाख महिलांना, तर १६,२३८ अपंग मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला.

योजनेंतर्गत २०२२-२३ या वर्षात ७८८.०६ लाख इतकी मनुष्यदिवस निर्मिती झालेली आहे.

योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या कामापैकी सन २०२२-२३ मध्ये एकूण ३,५४,२६१ इतकी कामे पूर्ण झालेली आहेत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यात सन २०२२-२३ या वर्षात ८,४०८ सिंचन विहिरी पूर्ण करण्यात आल्या आहेत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यात सन २०२२-२३ या वर्षात १,६२७ शेततळ्यांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

ई-मस्टर व ई.एफ.एम.एस (Electronic Fund Mangement System) मुळे योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांच्या बँक/पोस्ट खात्यावर १५ दिवसात मजुरी जमा करणे शक्य झाले आहे.

योजनेंतर्गत कामाची मागणी, तक्रार नोंदविण्याकरिता मदतवाहिनी (Helpline-१८००२३३२००५) सुरु करण्यात आलेली आहे. यामुळे मजुरांना घरबसल्या कामाची नोंदणी करणे शक्य झाले आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यात आतापर्यंत २५.२३ लाख कामे पूर्ण झाली आहेत.

## राज्य रोजगार हमी योजनेची सद्यस्थिती

### "मागेल त्याला शेततळे योजना":

१. राज्यातील टंचाईग्रस्त परिस्थिती पाहता, शेतकऱ्यांकडे स्वतःची संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्यासाठी शेततळी घेणे आवश्यक असल्याने राज्यात दि.१७ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये **"मागेल त्याला शेततळे"** योजनेची अनुदान पध्दतीने अंमलबजावणी करण्यात आली आहे.

२. शासनाच्या दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ५० पैसे आणेवारीची अट शिथील करुन कोकणसह राज्यात १,११,१११ इतक्या अर्जाचे सुधारीत लक्षांक देण्यात आला.

३. दिनांक २० मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मागेल त्याला शेततळे योजने अंतर्गत कोकण विभागासाठी सुधारित आकारमानाच्या शेततळ्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली. यामध्ये किमान धारण क्षेत्राची अट ०.६० हेक्टर वरुन कमी करुन ०.२० हेक्टर करण्यास मान्यता देण्यात आली.

४. आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये (TSP) लाभार्थी निवडीसाठी ठरवून दिलेली ०.६० हेक्टर जमिन धारणेची मर्यादा कमी करुन ती ०.४० हेक्टर इतकी करण्यास दि.०२.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली.

५. विभागाच्या दिनांक ०४ जुलै, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व मागेल त्याला शेततळे योजनेअंतर्गत अभिसरणाद्वारे शेततळ्याची कामे घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

६. इनलेट आऊटलेटसह व इनलेट आऊटलेट विरहीत शेततळे आकारमानाच्या शेततळ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. शेततळ्यांच्या उपरोक्त नमूद आकारमानांनुसार अनुदानाची रक्कम देय होईल. तथापि, देय अनुदानाची कमाल रक्कम रुपये ५०,०००/- इतकी राहील.

७. आतापर्यंत १,४९,५९० शेततळ्यांची कामे पूर्ण झाली आहेत. अनुदानापोटी रु. ६३८.५५ कोटी इतका निधी लाभार्थ्यांना वितरित करण्यात आला आहे. विभागाच्या दिनांक १७.११.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.५२.५० कोटी इतका निधी आयुक्त (कृषी) यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

**अनुदान अदायगीचा वर्ष निहाय खर्च -**

सन २०१६-१७ मध्ये रु.११५.४० कोटी

सन २०१७-१८ मध्ये रु.२१८.१५ कोटी

सन २०१८-१९ मध्ये रु.२०६.०० कोटी

सन २०१९-२० मध्ये रु.९९.०० कोटी

सन २०२०-२१ मध्ये रु.२०.०० कोटी

सन २०२१-२२ मध्ये रु.५२.५० कोटी

## नरेगा अंतर्गत शेततळे :

१००% मजूरामार्फत करावयाच्या शेततळ्याच्या उपाय क्र.१ मधील (इनलेट आऊटलेटसह-अ व इनलेट आऊटलेट विरहीत-ब) (एकूण ९ आकारमानांपैकी ८ आकारमानाच्या) शेततळ्यांचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अस्तरीकरणास दि. ६ एप्रिल, २०२१ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली.

## नरेगा अंतर्गत शोषखड्डे :

दि. २० एप्रिल, २०२१ च्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक तसेच सार्वजनिक जागेवर शोषखड्डे करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## नागपूर विभागातील सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम :

१. नियोजन विभाग (रोहयो) प्रभागाच्या दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया व नागपूर या जिल्ह्यांमध्ये ११,६१४ सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम घेण्यात आलेला आहे.

२. त्यास अनुसरुन विभागाच्या दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये उपरोक्त कार्यक्रमामध्ये वर्धा जिल्ह्याचा समावेश करुन सदर कार्यक्रमांतर्गत नागपूर विभागातील ६ जिल्ह्यांसाठी अतिरिक्त १३,००० सिंचन विहिरींचा लक्षांक देण्यात आलेला आहे.

३. विभागीय आयुक्त नागपूर यांना ११,६१४ धडक सिंचन विहिर योजनेकरीता रक्कम रु ३१५.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यापोटी रु.२८१.०७ कोटी इतका निधी खर्च करण्यात आलेला आहे.

४. त्यानुसार ११,६१४ सिंचन विहिर कार्यक्रमांतर्गत ११,६१४ विहिरींना मंजूरी देण्यात आलेली होती, त्यापैकी ११,४११ विहिरींचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

५. विभागाच्या दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये नागपूर विभागातील सिंचन विहिरींच्या धडक कार्यक्रमांतर्गत देण्यात आलेल्या अतिरिक्त १३,००० सिंचन विहिरीपैकी २५३८ विहीरींची कामे सुरु झालेली असून, ८२३ विहिरींचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

६. सदर योजनेंतर्गत दिनांक ३० जून, २०२२ पर्यंत विहिरींचे काम पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

७. विभागाच्या दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.२३ कोटी इतका निधी विभागीय आयुक्त नागपूर यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

विभागाच्या दिनांक २६ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये वर्धा जिल्ह्यासाठी रु.१०.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

विभागाच्या दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.१०.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

विभागाच्या दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.१७.५० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

विभागाच्या दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.३२.५० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. सदर योजनेकरिता आत्तापर्यत एकूण रु.९३.०० कोटी इतका निधी वितरीत केला आहे.

सदर योजनेंतर्गत विभागाच्या दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहिरींचे काम पूर्ण करण्यास दिनांक ३० जून, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

## धडक सिंचन विहिर कार्यक्रम

जवाहर विहीर कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यास विहीर मंजूर झाल्यानंतर विहिरीचे काम सुरु करण्यासाठी रु.१०,०००/- इतका अग्रीम देण्यात येतो. सदर योजना अनुदानित स्वरुपाची असल्याने लाभार्थी जसजसे विहिरीचे काम पूर्ण करेल तसतसे त्यांनी केलेल्या कामाच्या मोजमापानुसार लाभार्थ्यास अनुदान देण्यात येते. सन २००७-०८ व २००८-०९ मधील जवाहर/धडक सिंचन विहीर कार्यक्रमातील देण्यात आलेल्या लक्षांकापैकी लाभार्थी

निकषानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच लहान व सिमांत शेतकरी या प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांच्या विहीरीं महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र  या योजने अंतर्गत वर्ग करण्यात आल्या आहेत. इतर लाभार्थ्यांच्या जवाहर/धडक सिंचन विहीरींच्या देय असलेल्या रु. एक लक्ष अनुदानात सुधारणा करण्यात येऊन सदर अनुदान रु.२.५० लक्ष च्या मर्यादेत करण्यात आले आहे. याबाबतचा शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. जवाहर विहिर कार्यक्रमांतर्गत सन २००६-२००७ ते २००८-२००९ या वित्तीय वर्षामध्ये एकूण ५२,२५५ विहिरींचा लक्षांक देण्यात आला. एकूण ५२,२५५ विहिरींच्या लक्षांकापैकी ४९,४९३ लाभार्थ्यांना विहिरी मंजूर करण्यात आल्या. त्यापैकी ३४,९६१ विहिरी पूर्ण व ८४१० विहिरी रद्द करण्यात आल्या आहे. सद्य:स्थिती २१३५ विहिरी अपूर्ण आहेत. (जवाहर विहिर ६५३ व नरेगात वर्ग केलेल्या विहिरी १४८२) जवाहर विहिरी पूर्ण करण्यासाठी दिनांक ३०.६.२०१६ पर्यत मुदतवाढ दिनांक २७.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आली. मात्र जवाहर मधून नरेगात वर्ग केलेल्या विहिरी पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्यात आली नाही.









जवाहर विहिर योजनेत ६५३ विहिरी अपूर्ण आहेत.

## धडक सिंचन विहीर योजना

विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्ह्यांकरिता धडक सिंचन विहीर कार्यक्रम सन २००६ पासून घेण्यात आला आहे. विदर्भातील ६ जिल्ह्यांकरिता धडक सिंचन विहीरीचा १००० विहीरी प्रतितालुका याप्रमाणे एकूण ६४,००० विहीरींचा मूळ लक्षांक व ३०० विहीरी प्रतितालुका याप्रमाणे १९,२०० विहीरींचा वाढीव लक्षांक असा एकूण ८३,२०० विहीरींचा लक्षांक मंजूर करण्यात आला आहे.

**धडक सिंचन विहीर कार्क्रमासाठी लाभार्थ्यांच्या निवडीबाबत शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००९ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार लाभार्थी निवडीचे निकष खालीलप्रमाणे आहेत:-**

१. ज्या शेतकरी कुटूंबात आत्महत्या म्हणून आपत्ती आली आहे व त्यांच्याकडे विहिरी नाहीत अशा सर्व अनुसूचित जाती/जमाती/सर्व साधारण (फेरफारानुसार) लाभार्थी (दीड एकर ते १६ एकर पर्यन्त जमीन) वरील “एक” प्रमाणे विहीरीसाठी लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर जेवढा विहिरींचा लक्षांक शिल्लक राहील त्यापैकी ५० टक्के विहिरी या दीड एकर ते ८ एकर पर्यन्तच्या शेतक-यांना व उर्वरित ५० टक्के विहिरी या ८ एकराच्या वरील व १६ एकर पर्यंतच्या शेतकऱ्यांना देण्यात याव्यात. यामध्ये कमीत कमी ३० टक्के मागासवर्गीय लाभार्थी असणे आवश्यक राहील.

**धडक सिंचन विहिरी कार्यक्रमांतर्गत लाभार्थी निवडीसाठी दिनांक २३.३.२०११ च्या शासन निर्णयानुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे:-**

| | | |
|---|---|---|
| १. | संबंधित जिल्ह्याचे मा.पालकमंत्री | अध्यक्ष |
| २. | संबंधित जिल्ह्याचे मा.संपर्कमंत्री | सह अध्यक्ष |
| ३. | जिल्हाधिकारी | सदस्य |
| ४. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५. | वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा | सदस्य |
| ६. | कार्यकारी अभियंता (सिंचन), जिल्हा परिषद | सदस्य |
| ७. | उप जिल्हाधिकारी | सदस्य सचिव |

विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्ह्यांमध्ये असलेली विहिरींची कमी संख्या व भुगर्भात असलेल्या पाणी साठ्यामुळे सिंचनाखालील क्षेत्र वाढविण्यासाठी विभागाच्या दिनांक १५.१२.२००६ च्या शासन निर्णयान्वये उक्त ६ जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात १००० याप्रमाणे ६४ तालुक्यांना मिळून ६४,००० सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. तद्नंतर दिनांक २३.१.२००९ च्या शासन निर्णयान्वये विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या ६ जिल्ह्यातील ६४ तालुक्यांना प्रत्येक तालुक्यात ३०० याप्रमाणे १९,२०० सिंचन विहिरींचा अतिरिक्त लक्षांक देण्यात आला. उक्त ८३,२०० लक्षांकापैकी ७८,४०१ असा विहिरींचा लक्षांक ठरविण्यात आला. त्यापैकी ६३,९६२ लाभार्थ्यांना विहिरी मंजूर करण्यात आल्या. योजनेतील १५,४३० विहिरी सुरु न झाल्याने रद्द करण्यात आल्या. त्यामुळे धडक सिंचन

विहिरी योजनेमधून ४८,५३२ इतक्या विहीरी बांधून होणे अपेक्षित होते. सद्य:स्थितीत धडक सिंचन विहिर योजनेतील ४०,७२६ विहिरी पूर्ण झालेल्या आहेत. (धडक सिंचन विहिरी ३४,१९६+धडक मधून नरेगात वर्ग केलेल्या ६५३०) ७८०६ विहिरी अपूर्ण आहेत.

(धडक सिंचन विहिरी ८६९ + धडक मधून नरेगात वर्ग केलेल्या ६९३७)

योजनेत रद्द करण्यात आलेल्या १५,४३० विहिरींपैकी ८००७ विहिरी सुरु करणे व त्या पूर्ण करण्यासाठी दिनांक ३०.६.२०१६ पर्यतचा कालावधी देण्याचा निर्णय तसेच धडक सिंचन विहिरी योजनेतील नरेगात वर्ग करण्यात आलेल्या विहिरींपैकी अपूर्ण असलेल्या विहिरी नरेगा अंतर्गत विशेष मोहिम राबवून दिनांक ३०.४.२०१६ पर्यत पूर्ण करण्यास व तद्नंतरही त्या पूर्ण न झाल्यास धडक सिंचन विहिरी योजनेत वर्ग करुन पूर्ण करण्याचाही निर्णय दिनांक २७.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला.

विभागाच्या दिनांक २५.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत जवाहर/धडक सिंचनविहिर कार्यक्रमांतर्गत अपूर्ण स्वरुपात असलेल्या जवाहर विहिरी, धडक सिंचन विहिरी, नरेगातून धडक सिंचन योजनेत परत घेण्यात आलेल्या विहिरी व रद्द केलेल्या पैकी पुन्हा सुरु करावयाच्या धडक सिंचन विहिरी दिनांक ३०.६.२०१७ पर्यत पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्यात आली.

आतापर्यत योजनेत रद्द करण्यात आलेल्या १५,४३० विहिरींपैकी ८००७ विहिरी सुरु करण्याबाबत झालेल्या निर्णयानुसार पडताळणीअंती पुनर्जिवित करण्यास पात्र विहिरींची संख्या ६५१३ होती. त्यापैकी ३२७४ विहिरी मे,२०१८ अखेर पूर्ण झाल्या व ७६० विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत.

धडक सिंचन विहिर योजनेत १२,६३९ विहिरी अपूर्ण असून, त्याचा तपशील :-

धडक सिंचन विहिरी - ८६९

धडक मधून नरेगात वर्ग केलेल्या - ६,९३७

रद्द करण्यात आलेल्या विहिरींपैकी पुनर्जिवित करण्यात आलेल्या ६,५१३

विहिरींपैकी - ४,८३३

जवाहर विहिर योजनेत ६५३ विहिरी अपूर्ण आहेत.

सबब, धडक सिंचन विहिर व जवाहर विहिर योजना व योजनांमध्ये अनुक्रमे १२,६३९ व ६५३ म्हणजेच १३,२९२ विहिरी पूर्ण करण्यास शिल्लक आहेत.

नियोजन विभागाच्या दिनांक ७ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत धडक सिंचन विहिर कार्यक्रमास दिनांक ३० जुन, २०१८ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

निरोजन विभागाच्या दिनांक ७ नोव्हेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत धडक सिंचन विहीर कार्यक्रमाअंतर्गत दिनांक २७.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये पुनर्जिवित करण्यात आलेल्या ८,००७ विहिरींपैकी रद्द करण्यात आलेलया २,९८५ विहिरी पुन्हा पुनर्जिवित करुन पूर्ण करण्यास दिनांक ३० जुन, २०२० पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

## फलोत्पादन योजना :

राज्यातील कोरडवाहू शेतीचे प्रमाण जवळपास ८५ टक्के असल्याने या शेतीवर अवलंबून राहणाऱ्या लक्षावधी अल्प आणि अत्यल्प भूधारकांच्या शेती पध्दतीत परिवर्तन घडवून आणून पावसाच्या लहरीपणामुळे या शेतक-यांची आर्थिक दुर्बलता यावर मात करण्याच्या दृष्टीने शासनाने सन १९९०-९१ पासून रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन कार्यक्रम सुरु केला आहे. या कार्यक्रमा अंतर्गत वर्षनिहाय फळबाग लागवडीची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | फळबाग लागवड (हेक्टर) | |
|---|---|---|---|
| | | लक्षांक | साध्य |
| १ | २०१४-१५ | ११२०० | १०६९८ |
| २ | २०१५-१६ | ७००० | ६२९२ |
| ३ | २०१६-१७ | ५१४४ | ३३७६ |
| ४ | २०१७-१८ | लक्षांक नाही. | |

दिनांक २५.०४.२०१७ रोजी मा. मंत्री (कृषी) यांच्या अध्यक्षतेखाली व मा. मंत्री (रोहयो) यांच्या सह अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सन २०१७-१८ पासून राज्य रोजगार हमी या योजनेअंतर्गत नविन फळबाग लागवडीसाठी लक्षांक व अनुदान न देता, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

विभागाच्या दिनांक ०८ जुलै, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण विभागात नुकसानग्रस्त फळबागांचे रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग योजनेंतर्गत पुनर्लागवड व पुनरुज्जीवन लागवड कार्यक्रमास मान्यता मिळणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने विभागाच्या दिनांक १९ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.१४.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

विभागाच्या दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.६.०० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

विभागाच्या दिनांक ३०.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये “महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमीनीवर अमृत महोत्सवी फळझाड/वृक्ष लागवड व फूलपिक लागवड कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

१. मनरेगा अंतर्गत सुधारीत “अमृत महोत्सवी फळझाड/वृक्ष लागवड व फूलपिक लागवड कार्यक्रम” योजनेमध्ये अल्प भूधारक शेतकरी वर्गाचा समावेश करण्यात आलेला आहे.

२. योजनेचा लाभ अल्पभुधारक शेतकऱ्यांनाही घेता येणार असल्यामुळे अधिकाधिक मत्ता निर्माण होवून जास्तीत जास्त रोजगार निर्मिती होणार आहे.

३. पुर्वी प्रमाणे समाविष्ट असलेल्या पिकांसोबतच खालील पीके नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहेत.
फळझाडे : १) केळी (३ वर्ष) २) ड्रॅगनफ्रुट ३) ॲव्हाकॅडो ४) द्राक्ष  फुलझाड : १) सोनचाफा
मसाल्याची पिके : १) लवंग, २) दालचिनी, ३) मिरी ४) जायफळ

४. सद्यस्थितीत मनरेगा अंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रम क्षेत्रिय स्तरावर राबविण्यात येत असताना उदभवणाऱ्या त्रुटींचे निराकरण करण्यासाठी प्रस्तावित शासन निर्णयात सुधारणा केलेल्या आहेत. त्यामुळे योजना प्रभावीपणे क्षेत्रिय स्तरावर राबविता येणार आहे.

## राज्य रोजगार हमी योजनेतील भूसंपादन :

जुन्या राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या पाझर तलावांच्या कामासाठी भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आली होती. रोजगार हमी योजनेतील ज्या पाझर तलावांच्या कामासाठी भूधारकांच्या जमिनी संपादीत करण्यात आलेल्या आहेत, अशा भूधारकांना भूसंपादन अधिनियम १८९४ तसेच नवीन भूसंपादन कायदा, २०१३ मधील तरतुदीनुसार भूधारकास मोबदला देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते.

# महाराष्ट्र शासन

नियोजन (रोहयो) विभाग

सत्यमेव जयते

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र

## सन २०२१-२२ व सन २०२२-२३

## या वर्षाची सांख्यिकीय माहिती

परिशिष्ट - १ दृष्टिक्षेपात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना.

परिशिष्ट - २ सन २०२२-२३ या वर्षाची सांख्यिकीय माहिती.

परिशिष्ट - ३ सन २०२१-२२ या वर्षाची सांख्यिकीय माहिती.

परिशिष्ट - ४ सन २०२२-२३ या वर्षातील तालुकावार मनुष्यदिवस निर्मिती.

## परिशिष्ट - १

# दृष्टिक्षेपात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र

(आधार : एम.आय.एस. दि.१५/०६/२०२३)

| अ.क्र. | | तपशील | परिमाण | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | २०२२-२३ | २०२१-२२ |
| १ | | २ | ३ | ४ | ५ |
| १ | | जॉबकार्ड वितरित केलेल्या | | | |
| | १.१ | एकुण कुटुंबाची संख्या | (लाखात) | १०९.१० | १०६.९९ |
| | १.२ | अनुसूचित जातीच्या कुटुंबाची संख्या | (लाखात) | ९.६५ | ९.५२ |
| | १.३ | अनुसूचित जमातीच्या कुटुंबाची संख्या | (लाखात) | १५.०७ | १४.८९ |
| | १.४ | बँक/पोस्टात खाती असलेल्या नोंदणीकृत आधार संलग्न मजूरांची संख्या | (लाखात) | ४५.५९ | ४७.१९ |
| २ | | मजूरी वाटपासाठी बँक/पोस्टात मजूरांची उघडण्यात आलेली एकुण खाती | (लाखात) | १०६.५२ | १०५.०७ |
| ३ | | रोजगार उपलब्ध करुन दिलेल्या कुटुंबाची संख्या | | | |
| | ३.१ | एकुण कुटुंबाची संख्या | (लाखात) | २१.२१ | २०.३६ |
| | ३.२ | अनुसूचित जातीच्या कुटुबांची संख्या | (लाखात) | १.८६ | १.८३ |
| | ३.३ | अनुसूचित जमातीच्या कुटुबांची संख्या | (लाखात) | ३.७४ | ३.८५ |
| ४ | | रोजगार उपलब्ध करुन दिलेल्या मजूरांची संख्या | | | |
| | ४.१ | एकुण मजूरांची संख्या | (लाखात) | ३७.०७ | ३६.८८ |
| | ४.२ | महिला मजूरांची संख्या | (लाखात) | १६.५० | १६.२८ |
| | ४.३ | अपंग मजूरांची संख्या | (लाखात) | ०.१६ | ०.१८ |
| ५ | | मनुष्य दिवस निर्मिती | | | |
| | ५.१ | एकुण मनुष्यदिवस निर्मिती | (लाखात) | ७८८.०६ | ८२५.३२ |
| | ५.२ | अनुसूचित जाती | (लाखात) | ६३.०७ | ६७.४१ |
| | ५.३ | अनुसूचित जातीची टक्केवारी | (टक्के) | ८.०० | ८.१७ |
| | ५.४ | अनुसूचित जमाती | (लाखात) | १५८.७६ | २०४.२७ |
| | ५.५ | अनुसूचित जमातीची टक्केवारी | (टक्के) | २०.१५ | २४.७५ |
| | ५.६ | महिला | (लाखात) | ३५२.४३ | ३६०.३९ |
| | ५.७ | महिलांची टक्ककेवारी | (टक्के) | ४४.७२ | ४३.६७ |
| ६ | | सरासरी प्रतिकुटुंब मनुष्य दिवस निर्मिती | (दिवस) | ३७ | ४१ |
| ७ | | १०० दिवस रोजगार पुरविण्यात आलेल्या | | | |
| | ७.१ | कुटुंबाची संख्या | (लाखात) | १.३९ | १.७४ |
| | ७.२ | मनुष्यदिवस निर्मिती | (लाखात) | २१८.९६ | २१८.९६ |
| ८ | | एकुण उपलब्ध निधी | | | |
| | ८.१ | केंद्रशासनाचा हिस्सा | (रु.कोटीत) | २४१७.६७ | २०९३.७२ |
| ९ | | एकुण खर्च | (रु.कोटीत) | ३०५९.८५ | २३४२.७५ |
| | ९.१ | अकुशल मजुरीवरील खर्च | (रु.कोटीत) | १९८१.८१ | १८७२.२३ |
| | ९.२ | साहित्यावरील खर्च | (रु.कोटीत) | ९११.७९ | ३९९.९१ |
| १० | | मजुरी व साहित्यावरील खर्चाचे प्रमाण | | | |
| | १०.१ | मजूरीवरील खर्चाचे प्रमाण | (टक्के) | ६९ | ८३ |
| | १०.२ | साहित्यावरील खर्चाचे प्रमाण | (टक्के) | ३१ | १७ |
| ११ | | चालु वर्षातील एकुण पूर्ण कामे व चालु/स्थगीत कामे | | | |
| | ११.१ | पूर्ण झालेली कामे | (लाखात) | ३.५४ | २.३३ |
| | ११.२ | चालू/स्थगित कामे | (लाखात) | ८.६१ | ८.९४ |

परिशिष्ट - १

## दृष्टिक्षेपात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र

(आधार : एम.आय.एस. दि.१५/०६/२०२३)

| अ. क्र. | तपशील | | | परिमाण | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २०२२-२३ | २०२१-२२ |
| १ | २ | | | ३ | ४ | ५ |
| १२ | चालू वर्षातील कामाच्या प्रकारानुसार पूर्ण व चालू/स्थगित कामे | | | | | |
| | १२.१ | ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | ४७८२ | ४१७३ |
| | | | चालू कामे | | २५०३० | १८०९९ |
| | १२.२ | पूरनियंत्रण विषयक कामे | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | १०९० | ५५१ |
| | | | चालू कामे | | ११११ | १३७४ |
| | १२.३ | जलसंधारण व जलसंवर्धन विषयक कामे | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | ६५९३ | ७२३७ |
| | | | चालू कामे | | १४९२६ | १६५३७ |
| | १२.४ | दुष्काळ प्रतिबंधक कामे | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | १३३१७ | १३७०० |
| | | | चालू कामे | | ८५१८७ | ८९७६९ |
| | १२.५ | लघु सिंचन कामे | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | २१३ | ११६ |
| | | | चालू कामे | | ३८९ | ४७४ |
| | १२.६ | जमिनीच्या विकासाकरिता सिंचनाची कामे (Category IV) | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | ३१४७६५ | १९४६३२ |
| | | | चालू कामे | | ७१५८४६ | ७४२२५६ |
| | १२.७ | पारंपारिक जलस्त्रोताचे नुतनीकरणाची कामे | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | १६६५ | ९०० |
| | | | चालू कामे | | २३६६ | २९२२ |
| | १२.८ | भू-विकासाची कामे | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | २७५९ | २६८२ |
| | | | चालू कामे | | ३२६५ | ४२६३ |
| | १२.९ | भारत निर्माण राजीव गांधी सेवा केंद्र | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | ३ | २१ |
| | | | चालू कामे | | ६६ | ६८ |
| | १२.१० | ग्रामीण पेयजलाची कामे Rural Drinking Water | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | १४७ | २७५ |
| | | | चालू कामे | | २६० | ३९९ |
| | १२.११ | ग्रामीण स्वच्छता अभियान | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | ७९८० | ८०८२ |
| | | | चालू कामे | | ९४२९ | १४३८२ |
| | १२.१२ | इतर कामे | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | ९४७ | २०८ |
| | | | चालू कामे | | ३४१४ | ३१८३ |
| १३ | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र अंतर्गत सिंचन विहिरींची कामे | | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | ८४०८ | ९४६८ |
| | | | चालू कामे | | ५२९६० | ३८०७२ |
| १४ | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र अंतर्गत शेततळयांची कामे | | पूर्ण झालेली कामे | (संख्या) | १६२७ | २५१६ |
| | | | चालू कामे | | ७८८५ | ५९५१ |

## परिशिष्ट - २

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सांख्यिकीय माहिती सन २०२२-२३

| अ.क्र | जिल्हा | योजनेंतर्गत रोजगार निर्मिती | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जॉबकार्ड वितरित केलेल्या | | | | मजूरी वाटपासाठी बँक/पोस्टात मजूरांची उघडण्यात आलेली एकूण खाती | रोजगार उपलब्ध करुन दिलेल्या कुटुंबाची संख्या | | |
| | | कुटुंबाची संख्या | अनुसूचित जातीच्या कुटुंबाची संख्या | अनुसूचित जमातीच्या कुटुंबाची संख्या | बँक/पोस्टात खाती असलेल्या नोंदणीकृत आधार संलग्न मजूरांची संख्या | | एकुण कुटुंबाची संख्या | अनुसूचित जातीच्या कुटुंबाची संख्या | अनुसूचित जमातीच्या कुटुंबाची संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | ठाणे | १२७७०५ | ५४५५ | ४१६१३ | ३३१३४ | १२६८३९ | १४१३० | ४५४ | ५०९१ |
| २ | पालघर | २४८७१६ | २०२७ | २०७३३८ | १७९६५३ | ३८४८८२ | ८७२४९ | ३९७ | ७८७२३ |
| ३ | रायगड | ११७३१८ | ४७४९ | १९८१२ | २७१७० | १०५६६५ | १२९५७ | ६९४ | २९९२ |
| ४ | रत्नागिरी | १८९९३२ | ११२१७ | १७१३ | ६०५५४ | १६०८५८ | २८४०२ | १७३९ | २९२ |
| ५ | सिंधुदुर्ग | ८९०९० | ५१५८ | ३८३ | ५२८३२ | १२८८९० | १७४५५ | ७२६ | ६० |
| ६ | नाशिक | ६३५५९४ | १५४३६ | २०६०४३ | २२३१७६ | ५५३०९९ | ९०१४५ | १९३४ | ३३३०४ |
| ७ | धुळे | २८२१९३ | १९३७५ | ७४३८२ | ९६३१० | २८२७२४ | ४१७४१ | २७९९ | ११२०८ |
| ८ | नंदुरबार | ३५३२५३ | ११६१५ | २८९६११ | १८४१२२ | ३६५१२६ | ६८७२९ | २१५७ | ५७०१० |
| ९ | जळगाव | ४१४०७९ | ४०७२० | ५३८४८ | १४२२६९ | ४०२३३२ | ६६५५५ | ५८६४ | ६८५५ |
| १० | अहमदनगर | ६७५६७५ | ३९०३० | ३१९६४ | १९४९१३ | ४८१८८३ | ६७७५१ | ५५७८ | ३८६१ |
| ११ | पुणे | २६११६९ | १७९९२ | २२४६६ | ५८५१४ | १८८२३८ | २५८२३ | २१८० | ३०४९ |
| १२ | सातारा | २८६२२५ | २२४८० | २००८ | ७२००४ | २६०६७८ | २९५६६ | २३४६ | १७७ |
| १३ | सांगली | २१९७५९ | १७०५४ | ९५९ | ५३१८४ | २०८२६० | १९७३२ | १७७४ | ४९ |
| १४ | सोलापूर | ५११२४१ | ४४७०७ | ७५५२ | ७१९६८ | २६६४९८ | ३१५९७ | २८५६ | ३६४ |
| १५ | कोल्हापूर | २३९२६६ | ३०९३१ | ६६२ | ५३१११ | १८१०१९ | १७७९१ | २९९९ | ५० |
| १६ | औरंगाबाद | ५३३८८८ | २२०५२ | १०८१८ | १६८८४७ | ४३३७१८ | ८७३१० | ४००० | १६२९ |
| १७ | जालना | ३१३७४३ | १७६६८ | २६३७ | १८१७३७ | ३२७८८५ | ७९५८५ | ३९०२ | ५०४ |
| १८ | परभणी | २६९७९६ | २४६७९ | २९१४ | ११२२३४ | २७२८३४ | ७१२०१ | ३९२७ | ५०७ |
| १९ | हिंगोली | १७७२२३ | ३९९३३ | ३५८०३ | ८९१०१ | २०९६१६ | ४८५३६ | ७७१३ | ७२६६ |
| २० | बीड | ४१६८८६ | १५०४० | १७७९ | १४२३७२ | ३९९९८२ | १०३२४३ | २५९९ | ३१३ |
| २१ | नांदेड | ४५१८४२ | ८२५३८ | ४०७४२ | १३८३४३ | ४७३७४२ | ७७८९५ | १२७३२ | ५७०० |
| २२ | उस्मानाबाद | २४४७९२ | ३४६०३ | २४३६ | ६२५२८ | २२६१७८ | ३५२१८ | ४५४८ | २२३ |
| २३ | लातूर | ३३९७२१ | ५८७६१ | ४६४१ | १०८८८३ | ३१२५०८ | ५३८५३ | ८३०५ | ७०३ |
| २४ | बुलढाणा | ४५९४९१ | ४३५०८ | ११७५६ | ११९२५१ | २८८८५१ | ५४८०६ | ६९८७ | १३७९ |
| २५ | अकोला | २५७९८३ | ३७३४५ | १११६१ | ९०१८१ | १९८५५८ | ३५६२० | ५६६१ | १६७६ |
| २६ | वाशिम | २११०४३ | २५६१२ | ८३२९ | ६२२७५ | १८५२१५ | ३४६०८ | ३२९६ | ११६३ |
| २७ | अमरावती | ४१९९१६ | ४१८९० | ७०८५५ | २६५४५६ | ४९४५४२ | ११९७१४ | ११९४३ | ३२८५३ |
| २८ | यवतमाळ | ६३५८७५ | ४८१४९ | ९४२१० | २०२७४९ | ४४१५१५ | ९७११७ | ७५०९ | १३८४४ |
| २९ | वर्धा | १३६४४६ | १८८७२ | १६५६५ | ६१०१० | १७८२१८ | २४३२४ | २७५१ | २२७५ |
| ३० | नागपूर | २५५५७३ | ३५२५७ | २९०५० | १११०३१ | २५९८४७ | ५८४४० | ७९१९ | ७१९३ |
| ३१ | भंडारा | २७५६८२ | ३७५५१ | १८०४४ | २९८४१४ | ४५५४१६ | १३६५३५ | १६५१५ | ९६६८ |
| ३२ | गोंदिया | ३३९२९५ | २८९०२ | ४१८५३ | ३८०९५२ | ५५६०३२ | १७८६६५ | १४६८६ | २५३७२ |
| ३३ | चंद्रपूर | ३२१९४७ | ४२२६२ | ६५१६६ | २४०३०२ | ४२९४०२ | ११३६९३ | १६३४२ | २३२८९ |
| ३४ | गडचिरोली | १९७८२१ | २२६८१ | ७७७५९ | २१९९४२ | ४१११४३ | ९०९०० | १०१८१ | ३४९२६ |
| | **महाराष्ट्र** | **१०९१०१७८** | **९६५२४९** | **१५०६८७२** | **४५५८५२२** | **१०६५२१९३** | **२१२०८८६** | **१८६०१३** | **३७३५६८** |

## परिशिष्ट - २

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सांख्यिकीय माहिती सन २०२२-२३

| अ.क्र | जिल्हा | योजनेंतर्गत रोजगार निर्मिती | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रोजगार उपलब्ध करुन दिलेल्या मजूरांची संख्या | | | मनुष्य दिवस निर्मिती (लाखात) | | | | | | |
| | | एकूण मजूरांची संख्या | महिला मजूरांची संख्या | अपंग मजूरांची संख्या | एकूण | अनुसूचित जाती | अनुसूचित जातींची टक्केवारी | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमातीची टक्केवारी | महिला | महिलांची टक्केवारी |
| १ | २ | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| १ | ठाणे | २६२४६ | ११११६१ | ५५ | ४.१४ | ०.१२ | २.८८ | १.५३ | ३७.०० | १.७७ | ४२.६४ |
| २ | पालघर | १८२३३४ | ९६८३६ | ८८५ | ४९.३८ | ०.१५ | ०.२९ | ४६.१२ | ९३.३९ | २७.२७ | ५५.२२ |
| ३ | रायगड | २२७५७ | ९५४५ | ७३ | ३.६४ | ०.१५ | ४.१९ | ०.७८ | २१.३३ | १.५४ | ४२.४१ |
| ४ | रत्नागिरी | ४६३३६ | २०९२८ | १६१ | ७.५५ | ०.४२ | ५.५९ | ०.०७ | ०.८९ | ३.४१ | ४५.१३ |
| ५ | सिंधुदुर्ग | २९७६९ | १२१३४ | १७७ | ३.९८ | ०.१४ | ३.५४ | ०.०२ | ०.३८ | १.५८ | ३९.६४ |
| ६ | नाशिक | १५७६२९ | ६०३६९ | ७५६ | २७.२२ | ०.५५ | २.०२ | १०.१५ | ३७.३० | १०.२२ | ३७.५४ |
| ७ | धुळे | ७१३७५ | २८४७१ | ८९ | ११.१५ | ०.७३ | ६.५१ | २.९१ | २६.०९ | ४.४० | ३९.४४ |
| ८ | नंदुरबार | १०५४७२ | ४५०२४ | ९२ | २०.०२ | ०.६५ | ३.२५ | १६.२९ | ८१.३६ | ८.२९ | ४१.४१ |
| ९ | जळगाव | १०४६६१ | ३९९२६ | १५८ | २४.२१ | १.७६ | ७.२८ | २.२६ | ९.३४ | ९.४६ | ३९.०९ |
| १० | अहमदनगर | ११४८४७ | ४६५९१ | १८० | १८.३५ | १.४४ | ७.८७ | १.०३ | ५.५९ | ७.७१ | ४२.०२ |
| ११ | पुणे | ४५६९६ | १९२३६ | १४५ | ७.३१ | ०.६० | ८.१५ | ०.७९ | १०.७९ | ३.१६ | ४३.२६ |
| १२ | सातारा | ४६८६६ | २०७८९ | २५९ | ८.४९ | ०.५४ | ६.३३ | ०.०५ | ०.५४ | ३.७९ | ४४.६८ |
| १३ | सांगली | ३०८८१ | १२१७३ | ४४ | ६.५९ | ०.५६ | ८.५० | ०.०१ | ०.१८ | २.६२ | ३९.६९ |
| १४ | सोलापूर | ५४२२८ | २०३३२ | ७९ | ८.७२ | ०.६६ | ७.५८ | ०.०९ | १.०५ | ३.२७ | ३७.४७ |
| १५ | कोल्हापूर | ३१६७६ | १३९०४ | ५६ | ४.१६ | ०.७० | १६.७७ | ०.०१ | ०.३० | १.८७ | ४४.९९ |
| १६ | औरंगाबाद | १४९५२५ | ६०२८७ | ३५० | ३५.३८ | १.२३ | ३.४७ | ०.५२ | १.४८ | १४.४२ | ४०.७७ |
| १७ | जालना | १६४४१७ | ७०५७७ | २७८ | २७.८६ | १.०८ | ३.८९ | ०.१४ | ०.४९ | ११.९१ | ४२.७७ |
| १८ | परभणी | १२०९६३ | ४७४८९ | १५७ | ३०.३२ | १.२९ | ४.२५ | ०.१५ | ०.५१ | ११.८० | ३८.९० |
| १९ | हिंगोली | ८३९०२ | ३३८३६ | ९२ | १८.३५ | २.६२ | १४.२९ | २.७८ | १५.१३ | ७.४४ | ४०.५५ |
| २० | बीड | १९१३२७ | ७८१५७ | १५८ | ४६.६८ | ०.७७ | १.६६ | ०.१२ | ०.२६ | १९.१० | ४०.९२ |
| २१ | नांदेड | १२८६७० | ५५६८२ | १५३ | २९.२२ | ४.१० | १४.०४ | १.९८ | ६.७९ | १२.८५ | ४३.९८ |
| २२ | उस्मानाबाद | ६१४६८ | २४४१२ | १२७ | १४.०४ | १.२९ | ९.१७ | ०.०७ | ०.५२ | ५.६० | ३९.८८ |
| २३ | लातूर | ९२८०७ | ३७६४५ | १३५ | २३.७० | २.९१ | १२.२७ | ०.३४ | १.४३ | १०.०९ | ४२.५६ |
| २४ | बुलढाणा | ८०८६५ | २९४२२ | १४५ | १३.५७ | १.६७ | १२.३३ | ०.३१ | २.३१ | ४.८० | ३५.४० |
| २५ | अकोला | ५३६३८ | १९६१४ | १६८८ | १०.४० | १.४८ | १४.२७ | ०.४७ | ४.५३ | ३.७९ | ३६.४४ |
| २६ | वाशिम | ५४२४८ | २१६३८ | १६८ | ९.६६ | ०.७७ | ७.९९ | ०.२८ | २.८९ | ३.७५ | ३८.७९ |
| २७ | अमरावती | २३०६४९ | ९६०८५ | १०४४ | ८३.३९ | ९.६२ | ११.५३ | २८.९४ | ३४.७१ | ३२.५१ | ३८.९९ |
| २८ | यवतमाळ | १४९२३५ | ६३१७१ | ५२१ | ३१.२७ | २.१६ | ६.९१ | ४.१० | १३.११ | १२.९७ | ४१.४६ |
| २९ | वर्धा | ४४००७ | १७६७१ | २०२ | ९.४५ | २.१२ | ११.८५ | ०.८८ | ९.३० | ३.३८ | ३५.७९ |
| ३० | नागपूर | ८८६९५ | ३८९३९ | ४७१ | २२.८९ | ३.२७ | १४.२७ | २.७० | ११.८० | ९.५६ | ४१.७८ |
| ३१ | भंडारा | २३६०१० | १३१७६९ | ५८४६ | ४१.३९ | ४.७५ | ११.४८ | २.८६ | ६.९० | २४.३५ | ५८.८३ |
| ३२ | गोंदिया | ३१०२८३ | १७०६३८ | ३७१ | ६२.४५ | ४.८६ | ७.७८ | ८.८५ | १४.१८ | ३७.३० | ५९.७२ |
| ३३ | चंद्रपूर | २१२३९५ | १०६६३९ | ६६१ | ४१.६१ | ५.६० | १३.४५ | ८.९५ | २१.५१ | २१.०२ | ५०.५२ |
| ३४ | गडचिरोली | १८३२२३ | ८८९५१ | ४६२ | ३१.५० | ३.३१ | १०.५१ | १२.२० | ३८.७३ | १५.४२ | ४८.९४ |
| | **महाराष्ट्र** | **३७०७१००** | **१६५००४१** | **१६२३८** | **७८८.०६** | **६३.०७** | **८.००** | **१५८.७६** | **२०.१५** | **३५२.४३** | **४४.७२** |

## परिशिष्ट - २

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सांख्यिकीय माहिती सन २०२२-२३

| अ.क्र. | जिल्हा | योजनेंतर्गत रोजगार निर्मिती | | | | योजनेंतर्गत खर्च | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरासरी प्रतिकुटुंब मनुष्य दिवस निर्मिती | १०० दिवसापेक्षा जास्त दिवस रोजगार पुरविण्यात आलेल्या | | एकूण खर्च (रु.लाखात) | अकुशल मजूरीवरील खर्च (रु.लाखात) | साहित्यावरील खर्च (रु.लाखात) | मजुरी व साहित्यावरील खर्चाचे प्रमाण | |
